
।। श्री गुरु: शरणम् ।।

। दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा ।



प.प. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज


श्रीदत्तपादारविंदमिलिंद

ब्रह्मचारि पांडुरंग (रंगअवधूत) महाराज

विरचित

# श्रीवासुदेवसप्तशती

॥ परस्पर देवो भव ॥ ॐ ॥ श्वासे श्वासे दत्तनाम स्मरात्मन् ॥



प. पू. श्री रंग अवधूत महाराज (ग्रंथकर्ते)

श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारि पांडुरंग (रंगअवधूत) महाराज

विरचित

# श्रीवासुदेवसप्तशती

अर्थात

प.प. श्री वासुदेवानंदसरस्वतीस्वामीमहाराज

ह्यांचे ओवीबद्ध चरित्र

प्रकाशक : सिद्धयोग साधक मंडळ, वडोदरा
C/o श्री प्र.रा. अरगडे,
६,झवेरनगर, वाघोडिया रोड,
वडोदरा-३९० ०१९

सप्तम पुष्प : ३००० प्रती

प्रकाशन दिन : श्रावण वद्य ५मी शके १९३५
(प.प.श्री स्वामी जयंती दिन)
(दिनांक २५-८-२०१३)

मुद्रक : हेम प्रिन्टींग प्रेस,
३, लब्धी इन्डस्ट्रीयल अेस्टेट,
अेसीड मील कंपाउन्ड,
रणमुक्तेश्वर रोड, वडोदरा.

किंमत : रु. २०/-

-प्राप्ति स्थान-

श्री दत्त पुस्तक भंडार
श्री गरुडेश्वर दत्त संस्थान,
श्रीक्षेत्र गरुडेश्वर जि. नर्मदा (गुजरात)

सिद्धयोग साधक मंडळ,
C/o श्री प्र.रा. अरगडे,
६,झवेरनगर, वाघोडिया रोड,
वडोदरा-३९० ०१९ (गुजरात)

## –स्पष्टीकरण–

(१) सदर ग्रंथाचे तिसरे अक्षर उभे वाचल्यास श्री गीतेच्या १५ व्या अध्यायाचे पठण होते.

(२) वाचण्याचे सुगमतेसाठी '–' अशी खूण केली आहे. दोन्हीकडील अक्षरें मिळून एकच शब्द उच्चारावा.

उदा. – अ.१. ओवी–२ व ३ – पहा : —

(i) भ–विष्य= भविष्य.

(ii) भग–वा– न= भगवान.

(३) ग्रंथ पठण करताना मागील 'आरती' सह वाचावा म्हणजे श्री. गीता–अध्याय १५ वा पूर्ण होतो.

(४) अक्षराखालील आडवी रेषा '–' श्री गीतेच्या श्लोकाची पूर्णता दर्शविते.



# 卐 श्री गरुडेश्वर दत्त संस्थान तर्फे शुभेच्छा 卐

प.प. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज ह्यांनी आपले संपूर्ण जीवन श्री दत्त विचार धारेचा प्रसार व सनातन धर्माला पुनः नव चैतन्य प्रदान करण्यांत व्यतित केले. विशेषतः इ.स.१८९१ या काळांत संन्यास दीक्षा ग्रहण केल्यापासून ते इ.स.१९१४ मध्ये समाधि घेई पर्यन्तचा २३ वर्षे आसेतु हिमाचल प्रवास करोन ग्रंथ निर्मिती, प्रवचने, श्रीदत्त मंदीर स्थापना, अश्या उपक्रमाने अनेकांना त्यांचे जीवन समृद्ध करण्याचा मार्ग दाखविला. अनेक नास्तिकांना श्रद्धायुक्त केले आणि त्यांच्या प्रासादिक ग्रंथांनी 'यावत्चंद्रो दिवाकरो,' अध्यात्माचे अमृत प्राशन करण्याचा लाभ साधकांना उपलब्ध करोन दिला आहे. अश्या या लोकोत्तर दत्तावतारी श्रीवासुदेव स्वामींवर अनेक चरित्र-पोथ्या, बावन्या-आरत्या-ग्रंथ लिहिले गेले आहेत. हल्ली तर कादंबऱ्याही लिहिल्या गेल्या आहेत.

याच मालिकेतील प.प. योगानंद सरस्वती उपाख्य गांडामहाराज ह्यांनी लिहिलेल्या 'श्रीगुरुमूर्तीचरित्र' ह्या ग्रंथाचे स्थान फार वरचे आहे. ह्या मोठ्या ग्रंथांची अनेक जण पारायण करीत असतात. हल्लीच्या धकाधकीच्या काळात थोड्यावेळांत पण संपूर्ण चरित्र वाचण्याचा आनंद साधकांना व्हावा म्हणून प.पू. रंगअवधूत महाराजानी ७०० ओव्यांत 'श्रीवासुदेवसप्तशती' हा ग्रंथ लिहिला आहे. 'वासुदेव यतीश्वर । जो प्रत्यक्ष दत्तावतार । गांडा वर्णित तल्लीला अपार । तत्सार अल्प येथ । असे पू. बापजींनी ग्रंथ प्रारंभी म्हटलेच आहे. श्रीवासुदेव सप्तशती व आरती असे पठण केले तर भगवद्

गीतेचा पंधरावा अध्याय होतो अशी प्रासादिक मंत्रगर्भ रचना ग्रंथाची आहे. शंकाशीलता सोडून श्रद्धेने या ग्रंथाचे पठण केल्यास साधकाचें इहपरत्र कल्याण होईल असा निर्वाळा ही पू. बापजींनी दिला आहे. असा हा रसाळ चरित्र ग्रंथ प.प. वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांचे 'समाधि शताब्धि' वर्षात, प्रकाशित होत आहे, हा खरोखरीच भाग्ययोग आहे. भाविक-साधक, आर्त-जिज्ञासु ह्यांनी ह्या ग्रंथाचा पठण-लाभ घेऊन आत्मकल्याण साधावे ही प्रार्थना.

सिद्धयोग साधक मंडळ, वडोदरा ह्यांचे कार्यकर्ते, तळमळीने त्यांचे प.पू. गुळवणी महाराज ह्यांनी दाखविलेल्या सुपथावर यशस्वी वाटचाल करीत आहेत आणि त्यांचीच श्रीवासुदेवसप्तशती ग्रंथ पुन:प्रकाशन ही एक खूण आहे. असेच कार्य त्यांचे हातून होण्यास प.प. स्वामीचे वरहदस्त त्यांचे शिरी राहोत आणि त्यांना आरोग्यसंपदा, धनसंपदा लाभो ही श्रीचरणीं प्रार्थना करोन हा आशीर्वचन लेख पूर्ण करतो.

॥ श्री गुरुदेव दत्त ॥

**चंद्रकान्त गवारीकर**

प्रमुख विश्वस्थ,
श्री गरुडेश्वर दत्त संस्थान,
मु. गरुडेश्वर.

दिनांक २०-८-२०१३

|| श्री ||

# प्रस्तुत प्रकाशनाचे अनुदान - दाते

| | | रु. |
|---|---|---|
| १) | श्री डॉ. दिपक पु. शहापुरकर आणि संदीप पु. शहापुरकर [ पू. पितृ स्मरणार्थ ] | ५०००/- |
| २) | श्री प्रभाकर रा. अरगडे [ पू. मातृ-पितृ स्मरणार्थ ] | ५०००/- |
| ३) | श्री प्रदीप वि. खिरवाडकर, श्री तुषार वि. खिरवाडकर, श्री डॉ. रविन्द्र वि. खिरवाडकर [ पू. मातृ-पितृ स्मरणार्थ ] | ५१००/- |
| ४) | श्री रविन्द्र न. सोनी [ पू. पितृ स्मरणार्थ ] | ५०००/- |
| ५) | श्री दिलीप न. सोलापुरकर [ पू. मातृ-पितृ स्मरणार्थ ] | १०००/- |
| ६) | श्री सतीष न. सोलापुरकर [ पू. मातृ-पितृ स्मरणार्थ ] | ५००/- |
| ७) | श्री श्रीनिवास प्र. सोलापुरकर [ पू. मातृ-पितृ स्मरणार्थ ] | १०००/- |
| ८) | श्री सुचेत दि. सोलापुरकर | ५००/- |
| ९) | श्री किर्तीकुमार वि. जोशी [ पू. मातृ-पितृ स्मरणार्थ ] | २५००/- |
| | सौ. रजनीताई कि. जोशी [ पू. मातृ-पितृ स्मरणार्थ ] | २५००/- |

ॐ

।। श्रीदत्तः प्रसन्नोऽस्तु।।

# स र्व तो भ द्र म् ।

## सा का र ता ता र का सा
## का पि सा र र सा पि का
## र सा य मे मे य सा र
## ता र मे य य मे र ता

- श्री. प.प. ब्र. सद्गुरु वासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराज

अन्वयः- (हे) अमेयसार । तारमेय । (ते) सारसापिका तारका यमेरता सा कापि साकारता मे रसाय (अस्तु) ।

श्री।। हे प्रत्यक्षादिप्रमाणां अगोचर। प्रणव वेदसार ओंकार । त्यानेंचि त्वत्प्राप्ति निर्धार। होतसे साचार सद्भक्तां ।।१।।
।। निर्विकार तूं लोकांप्रत । देण्या शिक्षण होसी मूर्त। [1]यमादि अष्टांग योगींरत । सगुणत्वें चिद्‌धना ।।२।।
।। ती तुझी साकार मूर्ति । तारक जी कां भक्तांप्रति । षट्‌चतुर्द्विभुज दीप्ति । वागादिकां अगम्य ।।३।।
।। सारभूत स्वरुपानंद । त्यातें करुन देई प्राप्त । ती परमानंदप्राप्ती प्रत । त्वद्भक्त मी त्यां पोंचवो ।।४।।

**-रंग अवधूत**

---

१. यम - अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह.

ॐ

॥ श्रीदत्त प्रसन्नोऽस्तु ॥

# ॥ अथ श्रीवासुदेवसप्तशती प्रारंभः ॥

## उपोद्घात

॥ श्री गणेशाय नमः॥ श्री सरस्वत्यै नमः॥ ॥ श्रीसद्गुरुवे नमः॥

आधीं **न**-मन[1] गजास्यातें । आत्मैकत्वें सद्गुरुतें । संत साधू सज्जनांते । नमून ग्रंथ आरंभू ॥१॥
नाहीं **मो**-ह कविकीर्तीचा। अशुद्ध बोबडी ही वाचा। पुरवावा छंद बालकाचा । हातीं चंद्र घेण्याचा ॥२॥
एक **भ**-क्तीनें प्रेरित । झालोंसे लेखनीं उद्युक्त । न म्हणावें युक्तायुक्त । हृच्छुध्द्यर्थ यत्न हा ॥३॥
अत्य- **ग**-म्य सद्गुरुलीला । वर्णितां जेथ शेष थकला । बिंदु जैसा सागराला । मापूं धावला, तैसा मी ॥४॥
गुरु- **व**-रें धरुनि हात । लिहविला हा अल्प ग्रंथ । न करावी शंका येथ । व्हावें निर्ग्रंथ साधकें ॥५॥
आढ्य[2]-**ते**-ला करुन दूर । नित्य पठनीं होतां सादर । दुःख दारिद्र न राहिल । वरदान श्रींचें असे ॥६॥
नासे **वा**-ग्जाड्य तत्क्षण । पावे संपत्ति ऐश्वर्य धन। मुमुक्षुतें आत्मज्ञान । होय अल्प दिनांतीं ॥७॥
श्रद्धा **सु**-दृढ असावी । नीति स्वप्नींही न सोडावी। बैठक श्रीपदीं मारावी । पाहवी प्रचीत ग्रंथाची ॥८॥
वासु- **दे**-व यतीश्वर । जो प्रत्यक्ष दत्तावतार । गांडावर्णित तल्लीला अपार । तत्सार अल्प येथ ॥९॥
तप **वा**-ङ्मय पारायणें । पडे पदरीं अप्रयत्नें । प्रपंची परमार्थ जेणें । साधून अंतीं निर्वाण ॥१०॥
द्वार **य**-दृच्छें[3] हें साचे । मिळालें उघडें मुक्तीचें । कारण नाहीं भिण्याचें । रिघावें चतुरीं अंतःपुरीं ॥११॥



टीपः- १. गणपतीला २. अभिमान ३. अनायासें,दैवेंकरून.

# अध्याय १

वा.स. ।।१।। आदौ **श्री** विघ्नहरण । ओंकार परम पावन । तस्य वाचकःप्रणवः[1] म्हणून। दत्त चिद्घन वंदिला।।१।।

भूत **भ**-विष्य वर्तमान । जन्मे राही होय लीन । यद्ब्रह्मीं तोचि दत्त जाण । अत्रिनंदन त्र्यधीश[2] ।।२।।

जें अ- **ग**-म्य ब्रह्म निर्गुण । भावगम्य तेंचि सगुण । सृष्ट्यादिकर्मीं त्रिधा[3] जाण । अवतीर्ण एकरुपें ।।३।।

भग- **वा**-न दत्तात्रेय । करी लीला जो अमेय । पूर्वयुगीं वेदगेय । योगिध्येय तो पुनः ।।४।।

धरी **नु**-तन यतिवेष । नामें श्रीपाद नृहरि धीश । यल्लीला गुरुचरित्रीं खास । वर्णी द्विज सरस्वती ।।५।।

क्षेत्रें **वा**-डी गाणगापुर । कुरुगड्डी औदुंबर । कारंजा आणि पीठापुर। झालीं निर्माण यद्योगें ।।६।।

व्याप्त **च**-तुर्दिशीं कलि । होतां पुनः तोचि नृहरि । दत्तदेव अंशावतारी । विमलातीरीं जन्मला ।।७।।

देश **ऊ**-र्जस्वल[4] कोंकण । सावंतवाडी संस्थान । माणगांव जन्मस्थान । तेथें जाण श्रीगुरुचें ।।८।।

जो ऊ-**र्ध्व** नेई भक्तांतें । गणेशभट्ट पिता त्यातें । माता रमाबाई ज्यातें । वासुदेव यन्नाम ।।९।।

वेद **मू**-ळ ऋग्वेद हित । सूत्र आश्वलायन पूत[5]। टेंबे उपनाम विख्यात । धर्ममूर्त जो स्वयं ।।१०।।

सुका- **ल** वर्ष अष्टम। साधिलें मौंजीबंधनीं सत्तम। सिद्ध शास्त्रादि जया उत्तम। निमित्तमात्र अभ्यासें ।।११।।

जो जो **म**-न्त्र आपण शिके । त्याचे प्रयोग करूनि निके । उकिडवे गुरूसी कौतुकें। दाखवी बटु लीलया।।१२।।

जे अ- **धः**-पतित दीन । आर्तादि तयां लागून । तपः प्रभावें उद्धरी जाण । स्नानसंध्या करी प्रेमें ।।१३।।

वर्ते **शा**-स्त्राधारें आपण । ब्रह्मचर्यनियमें राहून । वर्जी छत्रोपानत्[6] वाहन । बोधी वर्तनें विप्रत्व ।।१४।।

मूर्ति **ख**-र्व[7] श्यामसुंदर । द्रष्टि स्थिर पाणीदार । पाहोनि वाटे त्रीशावतार । बालपणींच हा नकी ।।१५।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां वासुदेवानंद सरस्वत्यावतारो नाम प्रथमोऽध्यायः समाप्तः ।।१।। ओव्या ।।१५।।



टीपः- १. यो.द.१, २७.त्या परब्रह्म परमेश्वराचा वाचक ओंकार होय. २. तिन्हीं लोकांचा-गुणाचा अधिपति. ३. त्रिप्रकार ४.उज्ज्वल.५. पवित्र ६. छत्री आणि जोडा ७. ठेंगणी.

# अध्याय २

कोण **म**-हिमा वर्णू शके। जेथें अनंतमुखही थके । जन्मसिद्ध लीला कौतुकें। करी लोकार्थ अगम्य ।।१।।

फणी[1]- **श्व**-र होतां क्रुद्ध। मंत्रबळें करी बद्ध । पिशाचबाधा निवारी दुःखद । धर्मश्रद्धा वाढवी ।।२।।

हें इ- **त्थं**[2] ऐसे होईल । म्हणतां तैसें होत सकळ । सत्यवचनें मंत्रबळ । होय स्थिर क्रमानें ।।३।।

गाय **प्रा**-ङ्गणी शेजारी । असे एक दुधारी । दूध काढितां शिंगें उभारी । मारी लाथा एकदा ।।४।।

हो कां **हु**-षार कैसा । धजे ना जातां जवळीं तसा । मंत्रयोगें वासुदेव सहसा । करी शांत तियेतें ।।५।।

आचा- **र** प्रथम धर्म । पाळितां लाधे सर्व शर्म । तपःसिद्धीचें हें वर्म। गुह्यतम जाण पां ।।६।।

हें अ- **व्यं**-ङ्ग[3] कर्मोपासन । पुरश्चरण चांद्रायण । गुरुचरित्र पारायण । नित्य नेमें होतसे ।।७।।

जो स्व- **यं** दत्तावतार । अल्पाभ्यासें सांगे रसाळ । पुराण ज्योतिष उपचार । परार्थ रुग्णादिकां ।।८।।

शास्त्र **छं**-द न शिकतां । करी कवित्व तत्वतां । शास्त्रीबुवा नामें ख्यातता। चहूंराष्ट्रीं जाहली ।।९।।

शांत **दां**-त[4] उपरत । सेवी अतिथी अभ्यागत । वादविवाद न करीत। आनंदित सर्वदा ।।१०।।

मन- **सि** वचसि कर्मणि । नित्य धर्माचारें राहूनि । [5]प्रत्यब्दीं वाडीसी जाऊनि । दत्तदर्शन घेतसे ।।११।।

जेथें **य**-तींद्र श्रीपाद-। रूपें वसे स्वयं दत्त । नृसिंहसरस्वती द्वादशाब्द । करी तप यत्स्थानीं ।।१२।।

उपा- **स्य** मानूनि त्यांसी । गुरुद्वादशी उत्सवासी । जातसे नित्य अति हर्षी । अहर्निशीं तद्ध्यान ।।१३।।

यति- **प**-ति नारायण। जेथें जाहले पूर्वी जाण। तदुत्सवानिमित्त पण। जाणें तेथें होतसे ।।१४।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां बाललीलादिवर्णनं नाम द्वितीयोऽध्यायः समाप्तः ।।२।। ओव्या ।।१४।।



टीप:- १. सर्प २. या प्रकारें ३. यथासांग ४. इंद्रियनिग्रही ५. दरवर्षी.

# अध्याय ३

[1]अप- **र्णा**-पति समान । ज्ञानी स्वामी नारायण । पूर्वाश्रमीं कर्णाटकी ब्राह्मण। पुण्यपत्तनीं एकदा ॥१॥
वादीं **नि**-रुत्तर होत । पेशव्यांचे दरबारांत। अपमानिती पंडित। झाले दुःखित तेणें बहु ॥२॥
[2]वादा- **य** विद्या शिकावया । गेले काशीसी त्वरया[3] । झाले महापंडित कृपया । गुरुरायाचे सत्वर ॥३॥
तों अ- **स्तं**-गत विनय । पाहोनि बोले गुरुवर्य। वादें विद्वत्पराजय । केल्या होसी राक्षस ॥४॥
देईं **वे**-तन प्राप्त विद्या । मज पासूनि शिष्यराया । येरें पूर्वीचीही देतां तया । दयार्णव गुरु तुष्ट ॥५॥
शुभ- **द**-ऊन आशीर्वाद । बोळवितां शीघ्र वाडीसी येत । पत्नीसहित भजनरत। राहतां दत्त तोषला॥६॥
मागें **स**-हचरी[4] मुली । ठेवून दोन स्वर्गी गेली । नारायण एके काळीं । होते खोलींत ध्यानस्थ ॥७॥
शौच **वे**-दना मुलीला । होतां देव धांविन्नला। उत्थानीं वृतांत जाणिला । नारायणें जेधवां ॥८॥
घाम **द**-रदरून आला । दुःखाश्रूनें कंठ दाटला । पश्चात्तापें गहिंवरला । म्हणे दयाळा काय हें ॥९॥
सर्व[5]- **वि**त् परमेश्वरें । [6]भृत्यकर्म नीच केलें। होऊन संतप्त लेंकरे। बंधुकरीं अर्पिलीं ॥१०॥
होईं **अ**-नन्य शरण । दत्तपादाब्जीं तत्क्षण। पाशमुक्त होतां तूर्ण[7]। एक दिन स्वयं देवें ॥११॥
करीं **ध**-रोनि आश्रम । दिधला चतुर्थ उत्तम । यति नारायण सत्तम । अगाधमहिम तैं झाले ॥१२॥
तत- **श्वो**-त्तर पुण्यश्लोक । यात्रामिषें जातां देख । वैजनाथ क्षेत्रीं सह लोक । गांवी भिक्षार्थ जों गेले॥१३॥
तों ऊ- **र्ध्व** लोकी गेलेला । विप्रपुत्र एक पाहिला । लोक बांधित होते त्याला । नेण्याला दहनार्थ ॥१४॥
रे किं- **प्र**-योजन[8] बद्ध । करितां यासी हा जिवंत । वदतां ऐसें यति सिद्ध । प्रबुद्ध[9] जाहला तो ॥१५॥

---

टीप :- १. उमापति, शिव २. वादविवादसाठीं ३. वेगानें ४.पत्नी ५. सर्वज्ञ ६. नोकराचें (हलकें) काम ७. विलंब न करिता.
८. कशासाठी ९. जाग्रत.

वा.स. ॥४॥

ते निः- **सृ**-त प्राण आले । विस्मित लोक चमत्कारें । वंदिती तेथें जयजयकारें । एकभरें सर्व ते ॥१६॥
योगी **ता**-रक नारायण । पुनः येऊन वाडी लागून । राहिले तेथें आनिर्वाण[1]। प्रयाणसमयीं म्हणाले ॥१७॥
परा- **स्त** होतील पापें सर्व । प्रसन्न होईल त्यातें शर्व[2]। माझें स्नानसंध्यास्थान अगर्व । ठेवील स्वच्छ जो सदा ॥१८॥
सहा- **स्य** होती ब्रह्मलीन । ऐसे सांगून नारायण । समाधि बांधून भक्तजन । पुण्यतीथ उजविती ॥१९॥
तेथें **शा**-स्त्रीबुवा प्रतिवर्षी । जाती उत्साहा अतिहर्षी । स्थान पूर्वील दुर्गा मावशी । प्रतिदिवशीं झाडून ॥२०॥
वर- **खा**-लीं समंतात । पाणी शिंपून नितांत[3] । ठेवितां साफ आजीवनांत । दत्तकृपा लाभल्या ॥२१॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां नारायणस्वामिवर्णनं नाम तृतीयोऽध्याः समाप्तः ॥३॥ ओंव्या ॥२१॥

## अध्याय ४

तेथें **गु**-रुमर्ति वाडींत । नारायणस्वामींचे मंदिरांत । देखती गोविंदयती प्रत। ब्रह्मनिष्ठ ज्ञानी जे ॥१॥
जे गु- **ण**-राशि स्वयें असती । अन्यगुणांतें ओळखिती । देखतांच शास्त्रीबुवांतें म्हणती । हेंचि स्थान आपुलें ॥२॥
रात्रीं **प्र**-दक्षिणा घालितां । शास्त्रीबुवा झोंप न येतां । तेच दिनीं अवचितां । दत्तराज भेटले ॥३॥
वेषें **वृ**-द्ध संन्यासी । म्हणती येथें रात्रीसी । शेजारती नंतर येसी। कैंसा धृष्ट तूं अरे ॥४॥
ते श्र- **द्धा** नम्र वदती । मला येथील माहिति । नसे म्हणून झाली क्षती। क्षमा यती करा जी ॥५॥
कोण **वि**-चारिती चित्तीं । तोंच अदृश्य झाली मूर्ती । सांगतां गोविंदस्वामीं प्रति । हंसोनि-दत्त म्हणाले ॥६॥
हे वि- **ष**-ण्ण मनीं झाले । म्हणती हन्त नोळखिले। अभाग्यानें कैसें केले । धरिले न पाय कीं ॥७॥
देती **य**-ति सांत्वन । कृपा होईल पूर्ण म्हणून। तेच रात्रीं स्वप्नीं जाण । दत्तदर्शन जाहलें ॥८॥



टीपः- १. अंतकाळपर्यंत २. शिव ३. अत्यंत.

मंत्र प्र-कार सांगून । शिरीं हस्त ठेविती जाण । मंत्रोपासन उपनिषदीक्षण[1] । तैं पासून चाललें ॥९॥

वा.स. ॥५॥ जल्प[2] वा-द न करिती । शुद्धोपासन अन्यां बोधिती । भूतसाधना दूषिती । ऐसें भजन वाढलें ॥१०॥

[3]सक- ला: स्वनुतिष्ठेरन्निितिकृत्वा स्वयं तथा । दत्तावतारो लोकार्थं ह्यकामश्चाचरत्क्रियाः ॥११॥

योग अ-भ्यास करिती पूर्ण । झाल्या सिद्धी करतलतूर्ण । करिती लोकोपकार जाण । आर्तादिजन बोधूनि ॥१२॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां मंत्रोपदेशादिवर्णनं नाम चतुर्थोऽध्यायः समाप्तः ॥४॥ ओंव्या ॥१२॥

## अध्याय ५

कीर्ति ध-रातलीं वाढली । लहान थोर येती घरीं । एकदा ढोरेशास्त्री बली । मुंबापुरीचे पातले ॥१॥

ते सा-श्च-र्य म्हणती त्यांतें । तूप न खातां पाहोनि ह्यांतें । घृतेंविण योगाभ्यासातें । करितां गुदासंकोच ॥२॥

होतां मू-ळव्याध जडेल । शौचावाटें रक्त पडेल । म्हणून अल्प घृत घ्याल । तरी वाढेल अभ्यास ॥३॥

हे तु- ला बरे मिळाले । दत्त म्हणती गुरु ढोरे । खातां तूप पाय गळाले । अतिसारें शास्त्रीबुवांचे ॥४॥

अन- न्य आज्ञा देवाची । तधीं पासून मानिती साची । न मानिती वार्ता अन्याची । स्वार्थाचीही आपुल्या ॥५॥

तद- नु-सार वाडीसी । जातां नारायणोत्सवासी । भेटोनि देव विप्रवेशीं । करिती कैसी परीक्षा ॥६॥

वृथा सं-तप्त कां होतां । घ्या ही औषधी आतां । घेतांच रोगमुक्तता । होते कैसी पहा तें ॥७॥

ऐसें त-यांसी वदतां । शास्त्रीबुवा विचारिती चित्तां । प्रत्यक्ष देवाज्ञा नसतां । खातां येत नाहीं हे ॥८॥

देव ता-री देव मारी । तोचि सद्गुरु निर्धारीं । खावीं औषधें पामरीं । काळमस्करी नव्हे ही ॥९॥

तों ध्व-नि कर्णाभ्यंतर । पडे कीं तूं खा हें सत्वर। ऐकूनि म्हणती गुरुवर । प्रारब्ध भोगीन मी ॥१०॥



टीपः- १. उपनिषदांचें अवलोकन २. रिकामी बडबड
३. सकळ जन अनुसरती । ऐसे विचारुनि तैशा रीतीं । स्वयें दत्तावतार करिती । कर्मे लोकार्थ निष्काम ॥४.११॥

पूर्ण **क**-रून यात्रा येती । तोंवरी औधषें स्वस्थ राहती । येतां पुनः ग्रामा प्रति । अतिसार पूर्ववत् ॥११॥
तो क-**र्मा**-चा भोग पूर्ण । होतां एक वर्षें दारूण । झाली प्रकृति स्वस्थ तूर्ण। संपूर्ण नीरोग॥१२॥
आज्ञे- **नु**-सार अभ्यास । खेचरीमुद्रेचा खास । होतां पूर्ण सिद्धी दास । समस्त जाहल्या ॥१३॥
कर्म- **बं**-ध सर्व तुटती । कामिदादि भक्त धांवती । संत महंत दर्शना येती । जाती संतुष्ट होऊनि ॥१४॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां योगाभ्यासादिवर्णनं नाम पंचमोऽध्यायः समाप्तः ॥५॥ ओंव्या ॥१४॥

# अध्याय ६

स्थित-**धी** आजरेकर । बुवा मारुतिभक्त धीर । ज्यांना प्रसन्न महावीर । वारंवार येती ते ॥१॥
वाणी **नि**-घे मुखांतून । त्यांचे जी ती फळे पूर्ण । जेव्हां आविष्ट हनुमान । देहभान नसे त्यांते ॥२॥
झोळी **म**-धूनि त्या वेळीं । वाटेल तें काढिती बळी । शेर शेर तैल मळी । गिळिती शेंदुराची ॥३॥
महा- **नु**-भाव ऐसे होते । वयोमान न कळे तें । वृद्ध वृद्ध जे कां होते । म्हणती पूर्वींचे ऐसेच ॥४॥
करि- **ष्य**-माण[1] उत्सवास । दत्तप्रतिष्ठेच्या खास । जातां पाडगांवीं त्रास। होतां उदास जाहले ॥५॥
गांव **लो**-कां चिथवून । वाजंत्रीं केलीं बंद जाण । जहागीरदारें दुष्टें पूर्ण । केली नासाडी अन्नाची ॥६॥
कांही **के**-ल्या बुवा शांत । न होत झाले संतप्त । शापावया होतां उद्युक्त । वदती शास्त्रीबुवा त्यांसी ॥७॥
क्रोध **न** करावा साधूनें । तपोभंग होतो तेणें । कर्मफल ज्याचें त्यानें । भोगिल्याविण सुटे ना ॥८॥
ते क- **रु**-न येतां स्नान। क्रोधस्पर्शा निमित्त जाण । जाती स्वस्थानीं तपोनिधान । इकडे अन्नान्न दशा ॥९॥

टीपः- १. केल्या जाणाऱ्या.

वा.स. ।।७।।

अधः- **प**-तित दुष्टातें । आली जहागीरदारातें । साधूछलें कोणातें । सौख्य कधीं लाधलें ।।१०।।

असा **म**-धून मधून । भेटीसी येती संतजन । चमत्कार देखून । अन्य जन लोटती ।।११।।

[1]त्रीश **स्ये**-दं कर्तृत्व मानी । न लिंपे कदा अभिमानी । करुन अकर्तेपण ज्ञानी । समत्वें मिरवी सदा ।।१२।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां आजरेंकरकथानकं नाम षष्ठोऽध्यायः समाप्तः ।।६।। ओंव्या ।।१२।।

## अध्याय ७

हरि **ह**-र ब्रह्मा आपण । वर्ते लीलावेषा समान । एकदां वाडींत असतां जाण । जातांना शौचास ।।१।।

मार्गा- **त** देवाचा प्रसाद । घ्या म्हणोनि मुलें अडवीत । कौतुकें टाकितां मुखांत। पिटिती टाळी सर्वही ।।२।।

नाहीं **थो**-डाही घेतला । शिवरामशास्त्रांनीं अव्हेरिला । देव त्यांचे वर कोपला । धाडिला काळज्वर ।।३।।

येतां **प**-डले बेशुद्ध घरीं । पत्नी शास्त्रीबुवांना विचारी । येरें प्रसाद अव्हेराची परी । कथिली प्रत्यक्ष ।।४।।

एक **ल**-घुरुद्र स्वामींचे । आज्ञेनें उपरि पादुकांचे । क्षमापनार्थ करवितां त्यांचें । जीवींचें गेलें दुःख तैं ।।५।।

अल- **भ्य** प्रसाद देवाचा । टाळूनि न जावें साचा । परंपरागत धर्मांचा । ध्वंस तैसाच न करावा ।।६।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां देवप्रसादमाहात्म्यं नाम सप्तमोऽध्यायः समाप्तः ।।७।। ओंव्या ।।६।।



---

टीपः- १. हे कर्तृत्व दत्ताचें आहे असें मानी.

# अध्याय ८

होता **ते**-व्हां सांगेलींत । नामें दिवाकर विख्यात । उपनाम जडे शोभत । श्रीमंत गृहस्थ ॥१॥
उद्या- **नां**-त त्याचे एक । होता फणसवृक्ष देख । परंपरेनें होते पूजीत । घरांतील सर्व त्यासी ॥२॥
त्यातें **तो**-डी दिवाकर । वंध्य म्हणोनि दुःशील । वारितांही लोक सकळ । म्हणे मूर्ख कैसे हे ॥३॥
वृक्षीं **न**-सोनि देवत्व । दीप लाविती दुर्दैव । अज्ञानाची येते कींव । ऐसें वदोनि कापी तो ॥४॥
खालीं **चा**-लतां मूल एक । पडतां वृक्ष मरे देख । गेली समृद्धि लागली भीक । दिवाकराला तैं पासुन ॥५॥
पश्चा- **दि** सर्व मरती । अन्य वृक्षही न फळती । क्वचित् फळतां किडे पडती। फळें न येती कामास ॥६॥
पुन- **र्न** यावें ग्रामासी । टाळावया कुटुंबक्लेशासी । राहावें कोठें आश्रयासी। मानसीं ऐसें विचारी ॥७॥
दिशा **च**-हूंकडे ओस । दिसती झाला तो उदास । मित्राकडे बडोद्यास । अंतीं साश[1] येत जों ॥८॥
तोही **सं**-बंधी निवर्तला । ऐसा वृत्तांत ऐकिला । हळहळ लागोनि मेला । पुढें दिवाकर भट्ट तो ॥९॥
बंधू **प्र**-यत्न भास्कर । करी प्रार्थूनि एक वेळ । शास्त्रीबुवांसी त्यानंतर । सद्विचार सांगती ते ॥१०॥
योग- **ति**-ग्म[2] प्रारब्धाचा । टाळितां टळे ना साचा । केला अपराध देवाचा । परिणाम त्याचा हा ॥११॥
प्रति- **<u>ष्ठा</u>** फणस रोवून । पूर्वस्थानीं खालीं जाण । करून मूर्तीची सोद्यापन । पूजनादि पूर्ववत् ॥१२॥
करा **अ**-भिमान सोडून । म्हणजे धनधान्यसंपन्न । व्हाल पुनःसुखी पूर्ण । यासी उपाय न दुजा ॥१३॥
योगी- **श्व**-रां वंदून प्रेमें । जाऊन घरीं भास्कर नेमें । रोपून फणस पूजितां क्षेमें । संपन्न क्रमें जाहला ॥१४॥
[3]द्रव्यो- **त्थ** कष्ट निमाले । फणस झाड मोठें झालें । अन्य वृक्ष फळूं लागले । झालें लग्न मुलाचें ॥१५॥

टीपः- १. आशेनें २. तीव्र ३. द्रव्यामुळे उत्पन्न झालेले

रुप **मे**-धा[1] गुणयुक्त । वधू मिळाली प्रशस्त । भास्कर आनंदें डुल्लत। पुत्र स्नुषा पाहुनी ॥१६॥
त्या आ-**नं**-दाचें भरांत । विसरला प्रतिष्ठेची मात। इकडे पुत्र भ्रमिष्ठ । होऊन भटकूं लागला ॥१७॥
कांहीं **सु**-चे न त्यासी । शंकर सप्ते व्याह्यांसी । कळतां उभय शास्त्रीबुवांसी । पुसायासी गेले ते ॥१८॥
नाहीं **वि**-चार तुम्हांला । शास्त्रीबुवा म्हणती त्यांला । आली प्रचीत तरी बोला । विसरलान प्रतिष्ठा ॥१९॥
देव- **रु**-प फणस खास । वरी देवगणांचा वास । देतां त्यांसी उगाच त्रास । पिसें पुत्रास लागलें ॥२०॥
सुदृ- **ढ** विश्वास ठेवून । करा वृक्षाचें उद्यापन । खालीं मूर्ति स्थापून । पूजनादि विधिवत् ॥२१॥
दुःख- **मू**-ळ प्रमाद । देवकार्यीं जाणा विशद । वर्ततां आज्ञेसमान सुत । उन्मादमुक्त होईल ॥२२॥
त्यांनी **ल**-गेच सोद्यापन । केलें मूर्तीचें प्रतिष्ठापन । करितां पूजनादि सज्ञान । होऊन हरी घरीं आला ॥२३॥
झाला **म**-हानंद सर्वांला । धर्म चालत आलेला । मोडूं नये कोणे काळां । नादीं लागून खळांचे ॥२४॥
शास्त्र **सं**-मत करवून । कर्में ऐसीं लोकांकडून । धर्ममार्गीं लाविती जन । अनायासें शास्त्रीबुवा ॥२५॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
वृक्षे देवत्वस्थापनं नाम अष्टमोऽध्यायः समाप्तः ॥८॥ ओंव्या ॥२५॥

## अध्याय ९

होता **ग**-रीब विप्र एक । दुकान वाडीग्रामीं देख । भोळा सात्विक निःशंक । भगवद्भक्त पवित्र ॥१॥
शुद्धा- **श**-यें अभ्यागतां । सेवी सदा साधुसंतां । फळबाग त्याचा होता । चरितार्थ त्यावरी ॥२॥
जे शा- **स्त्रे** परे च[2] निष्णात । ऐशांसीच त्याची संगत । पाहोनि ऐसें वैश्य होत। कपटमित्र एक त्याचा ॥३॥
कठि- **ण** काळीज वाण्याचें । फलोद्यान ब्राह्मणाचें । हरावया चित्त त्याचें । करी कैसीं चातुर्य ॥४॥



---
टीपः- १.बुद्धि २. श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ.

वा.स. ।।१०।।

होतां **दृ**-ढ पाय त्यानें । केलें सुरु ऐसें बोलणें । घेतलें ऋण माझें ह्यानें । बाग गहाण ठेवून ।।५।।

तो च- **ढे**-लपणें बोले । कोणाचें कांहीं न चाले । खत बनावटी केलें । नोंदविलें दरबारीं ।।६।।

उद्या- **न** घेत कबज्यांत । कोणा पाय ठेवूं न देत । विप्रस्त्री पाहून रडत । लागे दाद न कोठेंही ।।७।।

सर्व **छि**-थू करीत । वैश्यातें, जाणोनि कपट । ऐके न तो मदोन्मत्त । दीननाथ शास्त्रीबुवा ।।८।।

मह- **त्वा** तें ओळखून । जाती विप्राकडे धांवून । मंत्र एक त्यासी सांगून । अनुष्ठान करविती ।।९।।

दिनां- **त** आठ तो वाणी । हैराण हैराण होऊनि । आला धांवत व्यथित मनीं । जोडत पाणी[1] वदे जी ।।१०।।

मी अं- **तः**-करणीं दुष्ट । केलें बनावटी खत। करा माफ घ्या परत । शेत तुमचें देव हे ।।११।।

ऐसा **प**-श्चातापें दीन । होतां झाला स्वस्थ तूर्ण । गेला घरीं माफी मागून । वाणी शठता सोडूनि ।।१२।।

विप्र **दं**-पती सद्गुरुसी । सांगती वंदून वृत्तांतासी । शास्त्रीबुवा म्हणती त्यांसी । मंत्रसिद्धि श्रद्धेनें ।।१३।।

वक्ता **त**-साच तपस्वी । असतां पूर्ण जैसा रवी । अनुष्ठानसिद्धि बरवी । एऱ्हवीं व्यर्थ सर्वही ।।१४।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां अनुष्ठानरहस्यं नाम नवमोऽध्यायः समाप्तः ।।९।। ओंव्या ।।१४।।

## अध्याय १०

जो त- **त्प**-र निंदेसी सदा । टवाळ्या करणें ज्याचा धंदा। कुळकर्णी ऐसा एक तदा । होता माणग्रामांत ।।१।।

तो प- **रि**-चयें निंदीत । शास्त्रीबुवांसी वाद खेळत । म्हणे ज्योतिषादि सब गलत । परीक्षार्थ एकदा ।।२।।



टीपः- १. हात.

वा.स. ॥१०॥

सांगा **मा**-झी दशा कैसी । ऐसें पुसतां सद्गुरुसी । ते म्हणती नडे शनि तुजसी । ऐकोनि हांसे खदखदां ॥३॥
सांस- **र्गि**-क दोषें भुलला । म्हणे विपुल द्रव्य मला । मिळतें कैशानें तें बोला । प्रतिकूळ ग्रह जरी ॥४॥
सांग- **त** श्री तया अरे । येईल प्रचीति अल्प काळें । रडशील मग जप बरें । न धरीं संदेह ॥५॥
ऐसें **व्यं**-ग्य बोलती । कांही दिवस जातां पुढतीं । आली रामनवमी तिथी । राजदूत त्या दिनीं ॥६॥
त्या नि-**य**-न्त्रण करून । खुनाचा आरोप ठेवून। हातीं हातकड्या घालून । घेऊन जाती कैदेंत ॥७॥
गेलें **स्मि**-त मावळून । झालें तोंड एवढेंसें म्लान । पश्चातापें अंतःकरण । पोळून रडे तो ॥८॥
महा- **न्ग**-र्व जो कां होता । गेला क्षणांत तो तत्वतां । म्हणे वृथा गुरुनाथां। शास्त्रज्ञा हंसलो मी ॥९॥
कोण **ता**-री तयां विण । ऐसें म्हणून आप्तांकडून । प्रार्थी त्यांसी क्षमा मागून । करा रक्षण बाळाचें ॥१०॥
करीं **न** मी ऐसें पुन्हां । करणें भूषण क्षमा तुम्हां । ऐकूनि श्री म्हणती आम्हां । नाहीं रागद्वेष कीं ॥११॥
करा **नि**-श्चये ग्रहशांति । शमेल उपाधि निश्चितीं । करवितां त्यानें तैशा रीतीं। अंतिम कोटीं सूटला ॥१२॥
हो कां **ब**-स्ताद दैवा पुढें । चाले ना कोणाचें घोडें । गुरुचरण धरितां कोडें । वांकडें करी कोण ॥१३॥
ती धू- **र्त**-ता नास्तिकता । गेली घनश्यामाची तत्वतां । ऐशी प्रचीति सत्वर येतां । सूटतांच तो आधीं ॥१४॥
एका- **न्ति**-क[1] भक्ति सहित । येऊन श्रीचरण धरीत । पश्चात्तापें गद्गदित । अंतीं सद्गति पावला ॥१५॥
होता **भू**-सुर[2] क्षयग्रस्त। ऐसा एक सांवतवाडींत । कोणी सत्पुरुष त्यासी सांगत । कांही निमित्त औषधी ॥१६॥
व भू[3]- **यः** त्यातें म्हणती । गुरुचरित्र पाठ निश्चितीं । करितां श्रद्धेनें सप्ताहरीतीं । रोग तुझा जाईल ॥१७॥
रोग **त**-सें करतां गेला । पुढें शुष्कवेदांत्यांचे संगतीला । लागून तो म्हणूं लागला । काकतालीयन्यायानें ॥१८॥



टीपः- १. एकनिष्ठ २. ब्राह्मण ३. पुनः.

वा.स. ॥११॥

नाहीं **मे**-लों रोग गेला । औषध खातां भोग सरला । वृथा महती पाठाला । दिली मूर्खपणें म्यां ॥१९॥
ऐसें- **व**-दून पाठ सोडला । स्वैरपणें वर्तूं लागला । स्नानसंध्ये दिधला टाळा । करूं लागला धर्मनिंदा ॥२०॥
पुण्या- **चा** सांठा संपत । पुनः यक्ष्मा[1] घाला घालीत । पूर्वीचें औषधही घेत । रोग तरी न शमे ॥२१॥
तो सा- **द्यं**-त वृत्तांत । स्मरूनि म्हणे हन्त हन्त । कंटाळूनि धांव घेत । श्रीचरणीं तेधवां ॥२२॥
श्रींसी **पु**-सतां ते म्हणती । जाऊनि प्रार्थी तो वेदांती । करुनि ज्याची संगती । पाठपूजा त्यागिलीं ॥२३॥
झाला **रु**-ष्ट त्रीश तुजसी । माझें न चाले कांहीं ह्यासी । काय करिसी वेदांतासी । भक्तिशून्य शुष्क जो ॥२४॥
मिथ्या **ष**-डंग[2] शरीर । रोग कैंचा रे सत्य, बोल । निरंजन तूं निर्विकार । म्हणसी ईश्वर मायिक ॥२५॥
जा सा- **म्प्र**-त निज गेहासी । देह असे तों देवसेवेसी । टाकून कैसा सुखी होसी । काय सांगूं अज्ञ मी ॥२६॥
घरीं **प**-रतविला त्याला। अश्रद्ध जाणूनि ऐसा सत्वरां। दुःखी होऊन अंतीं मेला। धिक्कारितां सदाज्ञा तो॥२७॥
विद्धे- **द्ये**-बुद्धिवेद्यता[3] । मानितां आली बद्धता । अहंकारें न चुके मूढता । सांगती सत्य श्रीगुरु ॥२८॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां शुष्कज्ञानवैयर्थ्य नाम दशमोऽध्यायः समाप्तः ॥१०॥ ओंव्या ॥२८॥

## अध्याय ११

बंधू **य**-ताक्ष[4] श्रींसी होता । सीताराम कनिष्ठ एकदा। गोप्रदान त्यानें घेतां । ज्वरपीडित झाला तो ॥१॥
न अ- **तः** पर घेईं दान । ऐसा संकल्प करवून । गायी सह किंमत द्विगुण । ब्राह्मणा देववितां ॥२॥

---

टीपः- १. क्षय २. जंघे बाहू शिरो मध्यं षडंगमिदमुच्यते-दोन मांड्या सहित पाय, दोन हात, डोकें व मध्य भाग मिळून सहा अंगें आहेत ज्याचीं असें. ३. अनुभवगम्य वस्तु बुद्धिगम्य मानितां. ४.जितेंद्रिय.

झाली प्र-कृति स्वस्थ पूर्ण । साधूवचन ऐसें गहन । शुद्ध वस्त्रीं डाघ तूर्ण । पडे जाण सर्वथा ॥३॥
ऐसे वृ-त्तीनें वागतां । विरक्त श्रीगुरु तत्वतां । एकवीस वर्षें पूर्ण होतां । लग्नग्रथित होती ते ॥४॥
[1]निवृ- त्तिः स्वान्तरे यस्य मग्नः प्रवृतिवारिधौ । न लिप्येत यथा कंजमितीव बोधितुं हि सः ॥५॥
आज्ञा प्र-माण दत्ताची। मानूनि कन्या बाबाजींची । सावंतवाडीस्थ गोंडे ह्यांची। वरीली निश्चितीं अन्नपूर्णा ॥६॥
जोडा सृ-ष्टींत विरळ । उमामहेशा सम निर्मळ । नाहीं परस्परां विकार । गृहस्थधर्में वागती ॥७॥
[2]सरि- ता समुद्रगामिनी । पत्नी पत्यनुसारिणी । शास्त्रीबुवा खाती अळणी । अन्नपूर्णाबाई तैसेंच ॥८॥
होता पु-रीं वर्षें चोविस । दत्तराज सांगती श्रींस । राहूं येऊन माणगांवास । वर्षें सात तुज संगें ॥९॥
बांधी रा-ऊळ जा तेथ । मूर्ति मिळेल वाटेंत। आज्ञा वंदून श्री निघत । वाडींतून तों मार्गी ॥१०॥
दो पा-णी जोडून ओतारी । कागलग्रामींचा सत्वरीं । दत्तमूर्ति एक करी । अर्पण त्यांतें सुंदर ॥११॥
भाव नि-र्मळ देखून । किंमत यथाप्राप्त देऊन। घेऊन मूर्ति स्थापन । माणग्रामीं करिती श्री ॥१२॥
[3]सुश- र्मा-र्थ जगताचे । पूजनादि चालविती साचें । धन्य भाग्य त्या ग्रामाचें । देव प्रत्यक्ष वसे जेथें ॥१३॥
येती न-रनारी दर्शना । आर्तादि कामना नाना । धरुनियां अंतःकरणा । समाधान पावती तीं ॥१४॥
जमे मो-ठी यात्रा तेथ । शनिवारीं असंख्यात । परी चोरी जारी किंचित । होत नसे कोठेंही ॥१५॥
[4]फले- हा सोडून सेवा । चालविती शास्त्रीबुवा । सांचतां अनंत पुण्यठेवा । कीर्ति वाढे दिगंतीं ॥१६॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
मूर्तिस्थापनं नाम एकादशोऽध्यायः समाप्तः ॥११॥ ओंव्या ॥१६॥

टीपः- १.(निवृत्ति ज्याचे अंतरी। झाला मग्न प्रवृत्तींत तरी । न लिंपे जळीं कमळा परी । जणूं ऐसें बोधण्याच कीं ॥५॥)
२.नदी समुद्राभिमुख वाहते. ३.अत्यंत कल्याणासाठीं ४. फलेच्छा.

# अध्याय १२

बाधा **जि**-न्दार्दींची दुर्धर । जातसे दर्शनें सत्वर । दुःखादींचा परिहार । कर्मानुसार सांगती ॥१॥
होता **त**-सें एक दिन । तेथील पाटीलाची जाण । कन्या भूतग्रस्त दारूण । आली शरण श्रीपदीं ॥२॥
भूत **सं**-चारें त्रासली । पित्यासह दर्शना गेली । पति जाचें कंटाळली । देखिली दशा गुरुनाथें ॥३॥
ते सां-**ग**-ती मंत्र एक । म्हणती जपीं हा सम्यक । देवासी प्रदक्षिणा देख । यथाशक्ति घाल तूं ॥४॥
तेणें **दो**-ष शांत होती । करितां तैसे पूर्ववत् ती । झाली चांगली अल्प दिनांतीं। पिशाचमुक्त सर्वथा ॥५॥
सुवे- **षा** पति सहित । येऊन श्रीपदीं वंदीत । निष्ठेसम फळ निश्चित । शास्त्रवचन न वृथा ॥६॥
तैसा **अ**-न्य एक दृष्टांत । विसोबाचा नोकर आर्त । शूळपीडित सेवार्थ । माणग्रामीं पातला ॥७॥
श्रींनी **ध्या**-नें शूळकारण । जाणोनि कथिली सेवा जाण। करितां श्रद्धेनें तैसें तूर्ण। निरोग पूर्ण तो झाला ॥८॥
अध्या-**त्म** गूढ नेणून । निजला मंदिरीं आज्ञेविण । स्वप्नीं कोणी सांगे जाण । मेला धनी जा घरीं ॥९॥
उठो- **नि** श्रींसी आज्ञा मागतां । ते म्हणती नको जाऊं तत्वतां। चाळवी पिशाच तुला निजतां। आज्ञेंविण मंदिरीं ॥१०॥
तरी **त्या**-सी वाटे ना खरें । गेला आज्ञेविण घरीं त्वरें । स्वस्थ विसोबा क्रोधभरें। धमकवून परतवी ॥११॥
शूळ **वि**-शेष पूर्वीहून । मार्गी पोटांत पिशाच जाण । करून उत्पन्न हरी प्राण। क्षणमात्रें तयाचें ॥१२॥
सोडो- **नि** सेवा आज्ञेविण । जाऊं नये अन्यत्र जाण । खेड्यांत जवळील सान । कुष्ठरोगी असे एक ॥१३॥
सेवा **वृ**-त्तींने देवास । भजतां माणग्रामीं खास । गेला तद्रोग लयास । दिवसांत कित्येक ॥१४॥
तो वृ- **त्त** गुरुद्वादशीचे । येतां कानीं उत्सवाचें । जावया वाडीस त्याचें । झाले चित्त चंचल ॥१५॥
वदे **का**-य तो सद्गुरुसी । नाहीं म्हणतां ते तयासी । देव एक भिन्नत्वासी । नसे स्थान इथे तेथें ॥१६॥

[1]निर्म- **मा:** साधवः सन्ति सर्वत्र समदर्शिनः। इदं निजं परं वेत्ति गणना लघुचेतसाम् ॥१७॥

वा.स. ॥१३॥ ऐसें **द्वं**-द्व[2] श्रीसी करून। जातां मार्गी कुष्ठ दारुण। पुनः उजळलें पूर्ववत् जाण । दर्शन वाडींत न घडे ॥१८॥

तो त- **द्वै**-[3] धेयत्वें फसला । उभयभ्रष्ट होऊनि मेला। जो सदाज्ञे विरूद्ध गेला । स्वार्थास मुकला ऐसाच ॥१९॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां देवसेवाप्रकारकथनं नाम द्वादशोऽध्यायः समाप्तः ॥१२॥ ओंव्या ॥१९॥

# अध्याय १३

पुन- **वि**-चार करून । व्हावें श्रीचरणीं संलग्न। वेंगुर्लेकर एक जण। सावंतवाडींत होता कीं ॥१॥

जो नि- **मु**-टपणें राही । कोणाच्याही आल्यागेल्यांत नाहीं । चौर्यारोप ठेवून तरीही। नेला धरून राजदूतीं ॥२॥

सुयु- **क्ता** टाकितां कैदेंत । देवासी चित्तीं आळवीत । म्हणे महापूजा वाडींत। सूटतांच करवीन ॥३॥

चेत- **स्सु**-तप्त जाहलें । अंतरीं भडभडून आलें । इतुक्यांत काय झालें । फूत्कारें अहि[4] एक ॥४॥

ते दे - **ख**-ती दूत येतां । भयें धांवती आडवाटां । सवें द्विज पळतां तथा । वियुक्त होतां सूटला तो ॥५॥

मार **दुः**-सह टळला । चोरीचा शोध लागला । पळतां दूत आडवाटेला । शोधार्थ खुनाचे ॥६॥

खरो- **ख**-र चमत्कार । मानूनि देवाचा द्विजवर । नवस फेडण्या सत्वर। जातां मार्गी वाडीचे ॥७॥

निज **सं**-निध श्वशुरानें । ठेवून घेतला आग्रहानें। विसरला नवसाचें फेडणें। कोपला तेणें श्रीदत्त ॥८॥

तो प्र- **ज्ञै**-कलभ्य[5] क्रुद्ध । होतां झालें गृह दग्ध । ऐकोनि हळहळलें हृद । आला दुःखित श्रीपदीं ॥९॥

टीपः- १. ममत्वहीन सत्पुरुष । सर्वत्र समदर्शी खास। हें माझें हे परकें ह्रास। असे वास क्षुद्रचित्तीं ॥१७॥
२. वाग्ययुद्ध ३. त्याचे मूर्खत्वाने ४. साप ५. ज्ञानानेंच ज्याचें स्वरुप कळतें असा

न दु- **र्ग**- ति मद्गकाला । ऐसें अभय देऊन त्याला। विसरलासी कां रे खला। ऐसा बोधिला गुरुवरें ।।१०।।
पर- **च्छ**-दें न वर्तीं कधीं। जाऊन वाडीस क्षमा आधीं । मागून फेड नवस सुधी । म्हणजे उपाधि जाईल ।।११।।
सुस- **त्य** मानूनि तैसे । वर्ततां दुःख अपैसें । जाऊनि सर्व कांही दिवसें। पूर्ण सुखी जाहला तो ।।१२।।
खून **मू**-र्खत्वें वालावलींत । केला कोणी पत्ता न लागत। निर्दोष विप्रा एक धरीत । श्रींनी वृत्त जाणिलें ।।१३।।
[१]न गू- **ढाः** श्रीगुरोरग्रे क्रियाः काश्चिद्भुवि क्वचित् । त्रीशमेनं न जानन्ति मोहजालसमावृताः।।१४।।
देती **प**-त्ता चिह्नें सांगून । सांपडले खुनी दिनांत तीन । सुटला निर्दोष ब्राह्मण। झाला अनन्य भक्त तो ।।१५।।
तो प- **द**-भ्रष्ट नोकरींतून। सावंतवाडीस्थ रामभाऊ जाण । सबनीस येती शरण। योगिनीमंत्र सांगती त्यां ।।१६।।
होतां **म**-न्त्रसंख्या पूर्ण । राजाधिकारी स्वयं जाण । बोलावूनि नोकरी तूर्ण। देती त्यांना पूर्वीची ।।१७।।
ऐसे **व्य**-क्त चमत्कार । करुनि रक्षिति भक्तवर । वासुदेव साठे वेंगुर्लेकर । पुत्र मूक तयांचा ।।१८।।
तो भ- **यं**-कर व्याधि त्याचा । देखून दोष पूर्वजन्मींचा । सांगून देती मंत्र साचा। जप ज्याचा करितांचि ।।१९।।
झालें **त**-त्-कारण दूर । बोलूं लागला मुका सत्वर । मातापिता जयजयकार । करुनि हर्षें गृहा जाती ।।२०।।
महा- **न** यात्रा शनिवारीं । जमतां एकदा, औदुंबरीं। आज्ञा नसतां स्पर्श करी । शूद्र एक दैवयोगें ।।२१।।
झाला **त**-या सर्पदंश । पडला भूवरी तो विवश । धांवले श्रीगुरु साक्षात् त्रीश। म्हणती संकट काय हें ।।२२।।
तों त- **द्रा**-न नाहींसे झालें । श्रीगुरुनीं देवासी प्रार्थलें । सुधादृष्टीनें उठविलें । क्षणार्धें त्या शूद्रा ।।२३।।
शूद्र **स**-द्भक्त असे एक । मसुरेंग्रामीं कुष्ठी देख । विमला नदींत स्नान सम्यक। करुनि घालं प्रदक्षिणा ।।२४।।
ऐसें **य**-तेन्द्रिय सांगती । करितां तैसें तों तो निश्चितीं । गेला रोग पूर्ण सद्गति । पावला अंतीं जाण तो ।।२५।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
आर्तादिभक्तत्राणं नाम त्रयोदशोऽध्यायः समाप्तः ।।१३।। ओंव्या ।।२५।।



टीपः- १. (श्रीगुरुंना गुप्त नाहीं। कर्म जगीं कोणतेंही । मूढ पडून भवडोहीं। त्र्यधीशा ह्या नेणती ।।१४।।)

# अध्याय १४

वा.स. ।।१४।।

कोण **ते**-ही व्यक्तिसी वाद । शास्त्रीबुवा न्हवते करीत। एकदा माणग्रामा प्रत। आबाशास्त्री वाडीचे ।।१।।

आले **सू**-रि[1] म्हणती श्रींतें। योगास प्रमाण नसे कोठें । श्रुतींत, ब्रह्मज्ञानातें । योग अष्टांग नको कीं ।।२।।

जै सू- **र्यो**-दयें प्रकाश । होत तैं तिमिरनाश । होतो स्वयं न सायास। लागती त्यास टाळण्या ।।३।।

अज्ञा- **न** ज्ञानेंचि नासे । ज्ञाना श्रवणाद्युपाय असे । आपण प्रतिपादितां कैसे । योगाभ्यास सर्वत्र ।।४।।

ऐसी **श**-ङ्का घेतां तेणें । मी तों शास्त्रवार्ता नेणें । ऐसें म्हणून राहिले मौनें । मान त्यांसी देऊन श्री ।।५।।

जों जों **शां**-तपणें ते वदती । तो तों आबाशास्त्री फुगती। होऊन गर्विष्ठ पुढतीं। निघती घरीं जावया ।।६।।

मार्गीं **को**-णी ब्रह्मचारी । भेटला त्यांना वेंगुर्लें बंदरी। त्यानें त्यांची खोड मोडली । अंतरीचें खंडून ।।७।।

न म- **न** स्थिर योगाविण । मनःस्थैर्या वांचून जाण । न घडे ध्यान निदिध्यासन । तद्विण ज्ञान द्दढावे ना ।।८।।

योग **पा**-हिजे म्हणून । ऐसें मुख बंद करुन । ब्रह्मचारी त्यांचें जाण । जातां क्षणें गुप्त झाला ।।९।।

गर्हिं **व**-रुन मागें येती । हतगर्व आबा सांगती । मागूनि क्षमा सर्व श्रीपदीं । प्रार्थिती साश्चर्य ।।१०।।

[2]स्तोतुं **कः** प्रभवेन्नूनं त्रीशं त्वां भक्तवत्सलम् । शास्त्रयोने दयासिन्धो त्राहि मां शरणागतम् ।।११।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
आबागर्वहरणं नाम चतुर्दशोऽध्यायः समाप्तः ।।१४।। ओंव्या ।।११।।



---

टीपः- १.शास्त्री २. (भक्तावत्सला त्रीशा तुला। स्तविण्या कोण समर्थ झाला। दयासिंधू शास्त्रमूळा। रक्षीं मला शरणागता ।।११।।)

# अध्याय १५

वा.स. ॥१५॥

पुढें **य**-दा एकदा आली । शरत्पौर्णिमा कोजागरी । पोह्यांचा ढीग सरासरी। देवा पुढें करी माता ॥१॥
न त- **द्रु**-त काढिती कंकर । देव रागावला त्यांवर । सुजला गळा न निघे स्वर । घाबरले शास्त्रीबुवा ॥२॥
देव - **त्वा**-कारण भाव । ज्याचा जैसा तैसा फलोद्भव। यथा देहे तथा देवे यास्तव । वर्ताव करावा ॥३॥
जाणू- **न** ऐसें क्षमापन । करतां रसज्ञावशात् स्तोत्रें जाण। माता स्वस्थ देव प्रसन्न । होतां क्षणांत जाहल्या ॥४॥
पुढें **नि**-घती शिवरात्रीसी । जावया गोकर्णी यात्रेसी । रमामातेच्या आग्रहा सरसी। देवासी ते नावडे॥५॥
जों ठे- **व**-ती पाय बाहेर । गांवाचे तों एक विखार । येऊन गर्दीतून निर्धार । डसे सत्वर श्रीपदीं ॥६॥
निव- **र्तं**-ती तैसेच घरीं । समाधि लाविती सत्वरीं । न उतरे विष कोणे प्रकारीं । करितांही उपाय मांत्रिक ॥७॥
न[१] अ- **न्ते**- वासीही करिती । औषधार्थ आग्रह अति । मातुश्रीही तैं पासून निश्चितीं । वागती श्रीतंत्रे ॥८॥
होतां **त**-धीं उत्सव पूर्ण । शिवरात्रीचा सद्गुरु तूर्ण । झाले स्वस्थ सूज उतरुन। अन्य शिक्षणा लीला ही ॥९॥
सुश्र- **द्धा** असतां अंतरी । देव तत्काळ दया करी। सोनाराचें संकट वारी। श्रीरूपें पहा दत्त ॥१०॥
होता **म**-हा श्रद्धाळू । भक्त एक सोनारु। वेदोक्तकर्म प्रकारु। करी मुंजीविण तो ॥११॥
बहु **प**-रींने श्री त्यातें । सांगती न करीं निषिद्धातें । न ऐके तो मानूनि भलतें । राजदूतें पुढें त्यासी ॥१२॥
बद्ध **र**-ज्जूनें करुन । चौर्यारोपें नेतां धरून । पश्चातापें श्रींसी शरण । येऊन माफी मागी तो ॥१३॥
बुद्धि **मं**-दतेनें भुलला । दुःसंगें स्वार्थास मुकला । येतां शरण श्रींस सुटला । निर्दोष होऊन तो पुढें ॥१४॥
श्रींतें **म**-नोहर मूर्ती । रामकृष्णदत्तादींच्या अति । अर्पी आणून तो पुढतीं। दत्ताज्ञेने श्री तदा ॥१५॥
एक **म**-नोज्ञ धातूची । मूर्ती स्वीकारिती दत्ताची । प्रवासांत पूजा जिची । करिती भस्मलेपनें ॥१६॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां सगुणोपासनारहस्यं नाम पंचदशोऽध्यायः समाप्तः ॥१५॥ ओंव्या ॥१६॥



टीप:- १.जवळ रहाणार, शिष्यवर्ग

# अध्याय १६

वा.स.
।।१४।। सद्धा- **म** नृसिंहवाडींत । दुर्गामावशी ज्या सेवारत । बंधू त्यांचा विख्यात । होता विनायक नामें ।।१।।
असे **मै**-त्री श्रींसी त्याची । संगत नसे अन्य कोणाची । त्या पितृव्य मातुलासी श्रींची । ऐसीच प्रीति असे ।।२।।
तो नि- **वां**-त माणग्रामीं । राहतसे नितांत अकामी । तों पुत्र सान सार्धाद्विगामी[1] । मरणोन्मुख जाहला ।।३।।
गृह- **शो**-भा पुत्ररत्न। रुग्ण[2] होतां श्रींसीं प्रश्न । करितां म्हणती करा यत्न । भीति नसे जीवासी ।।४।।
जीव **जी**-वन श्रीदत्त । भजा त्यासी अप्रमत्त। होती ऐकूनि सर्व हृष्ट । तरी दैवे मरे तो ।।५।।
ते श- **व** न देती दहनार्थ । आई आजी आक्रोशत । म्हणती श्री प्रत्यक्ष दत्त । अतथ्य वदती न कीं ।।६।।
झाले **लो**-क एकत्रित । समजावितां त्या न ऐकत । जाऊनि एक सद्गुरू प्रत । वृत्तांत सर्व तो सांगे ।।७।।
येन- **के**-न प्रकारेण । करा येऊन समाधान । शास्त्रीबुवा तेथें जाऊन। कथन काय करिती ते ।।८।।
जे जे **जी**-व जन्मा येती । प्रारब्ध संपतां ते ते मरती । अमर कोण मामी जगतीं । अवतारादि जाती कीं ।।९।।
कोणी **व**-स्तु नाहीं स्थिर । जें जें दिसें तें तें नश्वर । रडण्यांत वृथा काय सार । मोह व्यर्थ सोडा हा ।।१०।।
दोघी **भू**-यः त्यां प्रार्थिती । तत्वज्ञान न ठसे चित्तीं । समर्थवचन जातां पुढतीं । [3]धरित्रीं कोण भजेल ।।११।।
श्री स्व-**तः**- सीच म्हणती । अहो यांची दृढता किती । देवा धांव लाज निश्चितीं । राख श्रीपती वचनाची ।।१२।।
तों तो **स**-जीवन उठला। मृत पुत्र रडूं लागला । सुधादृष्टीने न्याहाळितां भला। जयजयकार वर्तला ।।१३।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां मृतपुत्रोज्जीवनं नाम षोडशोऽध्यायः समाप्तः ।।१६।। ओंव्या ।।१३।।



टीपः- १.दीड वर्षाचा २. आजारी ३. जगांत.

# अध्याय १७

वा.स. ।।१७।।

कर्म **ना**-से न कृत कधीं । प्रतिबंध नडे प्रारब्धीं । तरी अन्य जन्मीं आधीं । देई फळ सत्कर्म ।।१।।

ऐसें **त**-ये वेळीं सांगती । प्रश्नोत्तरा श्रीगुरुमूर्ति । सोहिरोबाचा दृष्टांत देती । म्हणती पुण्य व्यर्थ न ।।२।।

जें म- **नः**-पूत[1] तेंचि कर्म । करितां निष्काम पावे शर्म । करी नोकरी जाणूनि मर्म । बांदेकर सोहिरोबा ।।३।।

मार्गा- **म**-ध्यें चोरीं लुटतां । वसूलातीचें द्रव्य तत्वतां । महार वचनीं विश्वस्तां । सुटती जामीन देऊन ।।४।।

ते म- **नः** संकल्प करिती । घरदार विकूनि निश्चितीं । राजद्रव्य देऊं म्हणती । सत्य कोणी न मानी ।।५।।

निःशे- **ष** जीविका जातां । शेष राहे उदरचिंता । मित्रजनें जाणूनि तत्वतां । युक्ति एक काढिली ।।६।।

प्रति- **ष्ठा** जाईल गृहादि विकतां। आपण पूर्ण निर्दोष असतां। नासे चिंता भूपासी भेटतां। सत्यवार्ता ऐकेल तो ।।७।।

म्हणु- **नि** ऐसें सोहिरोबासी । शिफारसपत्र देती त्यांसी । जातां घेऊन नृपभेटीसी । मार्गी सिद्ध गैबीनाथ ।।८।।

जिते- **न्द्रि**-य भेटूनि मागती। क्षुधानिवारणार्थ कांही निश्चितीं। देतां फळादि त्यांनी प्रीतीं। राजभेटीसी घेतली जीं।।९।।

रहा- **या** इच्छिसी किती काळ । ऐसा मायोपाधींत बाळ । म्हणूनि ऐसें तत्काळ। नारिकेला सम शिर ।।१०।।

त्या फ- **णि**-वर भूषणभक्तें[2]। हालविलें धरुनि गैबीनाथें। नसे भान सोहिरोबातें। राहिलें समाधिस्थ त्रिदिन ।।११।।

येतां **प्र**-कृति वर पुन्हां । गैबीनाथ तेथें दिसतीना । आनंदमग्न व्याकुळमना। म्हणती हन्त ते अहा ।।१२।।

कृत- **कृ**-त्य करुनि मला । सद्गुरुनाथ कोठें गेलां । स्फुंदोनि रडती गद्गदगिरा। मारती लात नोकरीतें ।।१३।।

ते अ- **ति** समर्थ होऊनि गेले । पूर्वकर्मप्रभावें तरले । स्वानुभवपूर्ण ग्रंथ केले । लोकार्थ त्यांनी कित्येक ।।१४।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां सोहिरोबावृत्तकथनं नाम सप्तदशोऽध्यायः समाप्तः ।।१७।। ओंव्या ।।१४।।



टीपः- १. विचारानें निर्दोष- योग्य ठरेल तें २. शिवभक्तानें

# अध्याय १८

वा.स. ।।१८।। धर्म **स्था**-पना ऐशा रितीं । बोधाचरणें श्रीगुरुमूर्ति । करितां वर्षें सात जाती । लीलेंत माणगांवी ।।१।।

देवो- **नि** द्रष्टांत तधीं दत्त । यात्रार्थ निघण्या सांगत। नारायण उकिडव्यां प्रत। मंदिरादि सोंपून निघाले ।।२।।

पदीं **क**-रुनि साष्टंग नमन । मातेसी सांगती निश्चय तूर्ण। परिसूनि माता शोकपूर्ण। लोळण घेत भूवरी ।।३।।

आक- **र्ष**-ण मायेचें प्रबळ । श्रीगुरू म्हणती सर्व नश्वर । शाश्वत एक परमेश्वर । सौख्य पूर्ण तज्ज्ञानें ।।४।।

विर- **ति**-विण नाहीं ज्ञान । मायापाश न तुटे दारूण। ऐसें बोधिति पुनः पुनः। यदुअवधूतसंवादें ।।५।।

ऐसा **श**-मवूनि मातृशोक । वंदूनि निघतां पुण्यश्लोक । अन्नपूर्णाबाई निःशंक । निघती सवें जावया ।।६।।

मी श- **री**-र अर्ध आपुलें । कैसें टाकूनि जातां भलें । ऐसें विनवितां श्रींनीं दिलें । सह यात्रार्थ अनुमोदन ।।७।।

जो चि- **रं**-तन सखा श्रीदत्त। पूजेची तन्मूर्ति अंगुष्ठमत । पादुकां सह सवें घेत । विरक्त अंतरीं निघाले ।।८।।

लोक- **य**-ताश्रु[1] बोळविता । वियोगदुःखे तरफडती । परोपरीनें श्री बोधिती । म्हणती सिंधूकाष्ठवत् ।।९।।

असे **द**-र्शनीय हा मेळा । वियुक्त होणें एकदा सकळां । वृक्षपर्णवत् येरझारा । अविकल निजात्मा ।।१०।।

भूता- **वा**-स[2] भगवत्परम । म्हणूनि भजिजे आत्माराम। दत्तात्रेय सौख्यधाम । सहस्त्रनाम चिन्मय ।।११।।

हा स्व- **प्नो**-पम संसारसागरु । तरण्या भजनचि एक तारु । शांतवूनि लोक भक्तवत्सलू। चालूं लागती पत्नीसह ।।१२।।

जाता **ति**-कडे माणगांवी। कोलाहल मांडिला सर्वीं। गोकुळ सोडूनि कृष्णें पूर्वीं । जातां [3]बल्लवीजनें जैसा ।।१३।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां तीर्थयात्राप्रयाणं नाम अष्टादशोऽध्यायः समाप्तः ।।१८।। ओंव्या ।।१३।।



---

टीपः- १. अश्रु सावरुन २. प्राणिमात्रात वास करणारा ३. गोपीनीं.

# अध्याय १९

वा.स. ॥१९॥ पडे **य**-दा ऐसें दृष्टिस । वाटे सत्य पूर्वेतिहास। असो तेथून सावंतवाडीस। होऊन वाडीस आले श्री ॥१॥
तें स- **च्या**-रित्र्य पाहतां । भजनप्रेम डोळां बघतां। प्रीति करिती उभयतां। लोक तेथील सर्वही ॥२॥
तथा- **प्यु**-च्च संगतींत । दोघेही काळ दवडीत । ऐसें होतां वर्षा आंत । पुत्र होत पत्नीसी ॥३॥
न उ- **त्क्रा**-न्ति[1] वैराग्येविण । वैराग्यासी दुःख कारण । तदर्थ दत्त दयाघन । पुत्रनिधन[2] निपजवी ॥४॥
रडे **म**-तिमती[3] तरी पत्नी। समजाविती श्री नाना यत्नीं। ऋणानुबंधे जन्ममरणीं । शोककरणी ही वृथा ॥५॥
वेग **ती**-व्रतर दुःखाचा। न शमे कांही केल्या साचा। देखूनि,वृतांत विप्रकन्येचा। सांगती गंगेचा श्री तदा ॥६॥
सुन- **श्व**-र देह सोडूनि । जातां पति तद्रमणि[4]। शोकमग्न गंगा तरुणी। गेली शरण सुद्गुरुसी ॥७॥
[5]य:प- **<u>र:</u>** सर्वभूतानां भौतिकानां च यः परः। आत्मा ब्रह्मेति जानीयाद् भूतात्यये न यत्क्षयः ॥८॥
अन्य **गृ**-ही[6] गृहाहून। आत्मा भिन्न देहाहून। देह मरतां न मरे जाण । द्रष्टा भिन्न घटाहून ॥९॥
द्रष्टी **ही** ज्ञानाची उघडे । देहाहंता ममता झडे । तैं दुःख समूळ उडे । भवसांकडे राही ना ॥१०॥
ब्रह्म- **त्वै**- श्वर्ययुक्त स्वात्मा । सदा सच्चिदानंदधामा । बहुरुपी बहुनामा। नामरुपातीत कीं ॥११॥
अहं - **ता** देहाची नश्वर । धरिती मूळ अज्ञानें केवळ । असज्जड दुःखमूळ । शरीर आत्मा केवीं तो ॥१२॥
आत्मा **नि**-त्य, देह अनित्य । आत्मा अमर देह मर्त्य। देह जड आत्मा चैतन्य। ऐक्य दोहींचें घडे केंवी ॥१३॥
आत्म **सं**-गेंदेहादींत । चलनवलनादि दिसत । उच्चनीचादि योनींत । देहाहंत्वे संचरे ॥१४॥

टीपः- १. प्रगति २. मरण ३. बुद्धिशाळी ४. त्याची पत्नी ५. जो सर्व भूतांहून पर । भौतिकांहून तैसाचि पर । तो आत्मा ब्रह्मस्वरुप निर्धार । भूतनाशें नासे ना ॥८॥ ६. घरांत रहाणार; गृहस्थ.

नसे **या**-रीतीच प्राणाला। आत्मत्व चंचल मनबुद्धीला । शून्यसाक्षी याही वेगळा। निर्विकार संचला तो ॥१५॥
गुरु **ति**-येतें ऐसें बोधितां । साधनाभ्यास क्रमें सांगतां। सोहंध्यानें स्वस्थता । आली चित्तीं तियेच्या ॥१६॥
झाला **वा**-सनाक्षय मनोभंग । तत्वज्ञान होतां आवृत्तिभंग[1]। होऊनि विचरे निःसंग । जीवन्मुक्त गंगा ती ॥१७॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां गुरुद्विजकन्यासंवादकथनं नाम एकोनविंशोऽध्यायः समाप्तः ॥१९॥ ओंव्या ॥१७॥

# अध्याय २०

शोक **यु**-क्त पत्नीसी तेव्हां । ऐसे सांगूनि शास्त्रीबुवा। म्हणती सोडूनि अज्ञानोद्भवा। अहंभावा सुखी हो ॥१॥
जैं दु- **र्ग**-धी सुटे प्रेतासी। तैं कां न कवटाळिती छातीसी। असंख्यात भेटतां मृत्युसी। पाहतां ही आशा न सुटे ॥२॥
बहु- **धा** उपदेशिती ऐसें। म्हणती विचारीं सोडीं पिसें। अहं-ब्रह्म सर्वीं विलसे। कैसें तुजसी उमजे ना ॥३॥
ऐकु- **नि** ऐसें पतिवचन । अन्नपूर्णाबाई म्हणती जाण। सर्व खरें परंतु ज्ञान। टिके ना हें मच्चित्तीं ॥४॥
द्या दे-**वा** आशीर्वचन । कृपाप्रसादें आपुले मन । होवो शांत ऐसें म्हणून । लोटांगण घालिती ॥५॥
पन्त्या **श**-य जाणूनि तदा। शिरीं हस्त ठेविती श्री मुदा। सुधादृष्ट्या पाहतां अद्धा[2] । कृतकृत्यता बाणली ॥६॥
द्विती- **यात्** वै भयं भवती[3] । ऐसी असे श्रुतिसंमति। एकात्मज्ञानें शोकसंहृति । होतां गाती स्वानंदें ॥७॥
अन्य **श्रो**- तव्य न राहिलें । श्रुति तेंही न स्मरलें । चित्त समूळ लया गेलें । जग भासलें दत्तरुप ॥८॥
देह- **त्र**-या नसे मूळ । स्फुरे कोठून कुलशील । फिरें जगीं अनर्गळ[4] । बरळत वेडे परी ॥९॥

---

टीपः- १.आवरणाचा नाश २. निश्चितपणें ३. दुसऱ्यामुळें भय वाटतें-एक आत्म्याचे ठिकाणीं दुसऱ्याची (जगादींची) भ्रांतिच भयास कारणीभूत आहे. ४. वाटेलतसें; स्वतंत्र.

प्रप- **श्र**-झाला परमानंदू। मना लागला एकचि छंदू। बळेंचि हुंकार गोविंदु । सोहंशब्द निघे मुखें ।।१०।।
नाहीं **क्षु**-द्र अहंकार । आतां कैंची येरझार। मृगतृष्णाजल संसार । सार निःसंग झालें मी ।।११।।
[1]आग- **स्स्प**-र्श न राहिला । थारा नसे जनलज्जेला। आलिंगून परपुरुषाला[2]। घालीन नभीं धिंगाडा ।।१२।।
स्वद- **र्श**-नें उन्मत्त होती। अनुभवगीत ऐसें गाती। देखून पत्नीची ती स्थिती । म्हणती संतुष्ट श्री तदा ।।१३।।
महा- **नं**-द उचंबळला । मी-तूं-भेदा नाहीं थारा। तथापि संसारीं मर्यादेला । धरून राहती ज्ञानी जन ।।१४।।
सती- **च**-र्येनें तुवां रहावें । अनसूयादि सम वागावें । पतीची दासी देहभावें । जीवभावें तदंश ।।१५।।
एक- **र**-स आत्मभावें । पतीसी पत्नीनें मानावें । जलतरंगवत् रहाटावें । व्यवहारीं बाह्यद्रष्टी ।।१६।।
ऐसें **स**-स्मित बोलून । राहिले श्री मूकवदन । सती पावून समाधान । करी वंदन श्रीपदीं ।।१७।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
पत्न्युद्धरणं नाम विंशोऽध्यायः समाप्तः ।।२०।। ओंव्या ।।१७।।

## अध्याय २१

तद- **नं**-तर वाडीहून । देवाज्ञेनें करिती प्रयाण । कोल्हापुरीं देवीदर्शन । घेऊन पातले पंढरपुरीं ।।१।।
चणे- **घ्रा**-णीं लावून ठेविले। द्विजवेषें देवें जे प्रसाद दिले। बाजारींचे जाणून न भक्षिले। जाणिलें विठोबानें ।।२।।
रे आ- **ण** फुटाणे माझे। नको तुला तर ओझें। ऐसें म्हणूनि पंढरीराजें । मागुतीं स्वप्नीं घेतले ।।३।।
अत्य- **मे**-य देवाची लीला । पाहूनि श्रींना विस्मय वाटला । प्रार्थूनि क्षमा पंथ धरिला । बारसीक्षेत्राचा ।।४।।

टीपः- १.पापाचा स्पर्श. २. परमात्म्याला. ३. नाकाला.

भग- **व**-दर्शन घेऊन । परळीवैजनाथीं आले जाण । चातुर्मास तेथें करुन । गंगाखेडीं पातले ॥५॥
तेथें **च**-रित्र द्वापरींचें । पत्नीप्रश्नें सांगती साचें । द्विजकन्यकाअंत्यजाचें । नीचकर्मरत यत्पुत्र ॥६॥
झालीं-**अ**-ग्निदग्ध दोह्नीं । वेळू होऊनि मधुवनीं । जन्मतां हरीनें बंसीवादनीं । केलीं धन्य तीं कशीं ॥७॥
यथा- **धि**-कारें उद्वाह[1] । न होतां, पतीचा सदेह । करुनि त्याग निःसंदेह । धर्मराहें वर्तावें ॥८॥
तन्नि-**ष्ठा** देखूनि तैसें । पत्नीसी श्री बोधिती, ऐसें । होतां कालक्रमण अपैसें । पत्नीस मृत्यु पातला ॥९॥
होती **य**-दा चौदा वासर[2]। और्ध्वदेहिकादि संपतां सत्वर । घेती संन्यास श्रीगुरुवर। प्रेषोच्चार श्रीदत्त ॥१०॥
स्वयं **म**-हा गोविंदस्वामी। रुपें करविती स्मर्तृगामी । पूर्वींच गत मोक्षधामीं । पुण्यनामी वाडींत जे ॥११॥
देऊ- **न** मंत्र गुप्त होती। वासुदेवानंदसरस्वती । योगपट्ट ठेविलें प्रीतीं । पुढें प्रसिद्धि तन्नामें ॥१२॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
संन्यासग्रहणं नाम एकविंशोऽध्यायः समाप्तः ॥२१॥ ओंव्या ॥१२॥

## अध्याय २२

तों प- **श्चा**-त्ताप जन करिती। नोळखिले म्हणून यतिपति। तेथून श्री वासीमा प्रति। थांबले जातानां माहुरीं ॥१॥
सुभ- **यं**-कर त्यां राजदूत। बैसविती तेथें चौकींत। कांही केल्या न सोडीत। करिती मस्कऱ्या सत्तामदें॥२॥
श्री **वि**-विध रीतीं बोधिती । तथापि नायकती ते दुर्मती । चंद्रग्रहणींही स्नानार्थी । जाऊं देती न त्यांतें ॥३॥
न दो- **ष** काढिती श्री त्यांचा । विचार करिती प्रारब्धाचा । तों त्याच मार्गी वरिष्ठ त्यांचा । फौजदार संचरला ॥४॥
त्यानें **या**-त्रेकरु ओळखिले । जवळीं जाऊन पाय वंदिले। राजपट्ट दूतांचे हरिले । जाणिलें जेव्हां इतिवृत ॥५॥



टीपः- १. लग्न २. दिवस.

वा.स. ।।२३।।

ते अ- **नु**-तप्त अंतःकरणीं । क्षमा मागती श्रीगुरुचरणीं । अधिकाऱ्यास सांगून श्रींनीं । पुनः पट्ट देवविले ।।६।।

त्यां अ-**प**- कारियां उपकारें । ऐसें क्षमामूर्ति गुरुवरें । बोधून साधुत्व तेथून त्वरें । माहूरगडीं आले श्री ।।७।।

साधु **से**-व्य मातृतीर्थीं । स्नान करिती वरकीर्ति । अत्र्यनसूया भावें वंदिती । नमिती श्रीरेणुका ।।८।।

दत्ता- **व**-धूता प्रार्थुन। करीत पायीं मार्गक्रमण। उज्ञनीस विचक्षण । देवाज्ञेनें पातले ।।९।।

जे हो- **ते** दत्तमंदिरीं यति। नारायणानंदसरस्वती। त्यांचे पासून दंड प्रीतिं । विधिवत् घेतला ।।१०।।

मागा **उ**-द्या पासून माधुकरी । करा आज मठभिक्षा बरी । आज्ञापितां ऐसें गुरुवरीं । करिती श्री तैसें तदा ।।११।।

हें उ- **त्क्रा**-मण न रुचलें देवा । वांत्या होऊं लागल्या वासुदेवां। नारायणस्वामींनी करितां धावां । सर्वस्वीं थांबल्या ।।१२।।

आस- **मं**-तात् पसरली कीर्ति। कोणी आग्रह पुढे न करिती । स्वतंत्रपणें वागूं देती । येती तथा सारंगपुरीं ।।१३।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां दण्डग्रहणं नाम द्वाविंशोऽध्यायः समाप्तः ।।२२।। ओंव्या ।।१३।।

## अध्याय २३

शास्त्र **तं**-त्रें वागती स्वतां । नास्तिकां शिक्षण देण्याकरितां। केशवराव तत्रस्थ एकदा। प्रार्थितां भिक्षार्थ न जाती ।।१।।

भ्रष्ट **स्थि**-ती त्याची देखून। म्हणती तुम्हां सारिख्यांचे अन्न । घेण्यापेक्षां बरें मरण। ब्राह्मण कैंचे तुम्हीं हो ।।२।।

तर्धी **तं**-द्रीं[1] उडाली त्याची । पटतां खात्री वचनाची । माफी मागून स्वामींची । धर्मचर्येस लागला ।।३।।

श्रद्धा **वा**-ढतां ब्रह्मकर्म । स्वयें शिकोनि लाधला शर्म। भिक्षा घेऊनि स्वामिसत्तम । तन्मातेसी तोषविती ।।४।।



टीपः- १. सुस्ती

वा.स.
॥२३॥

धर्म **पि**-पासा तत्रस्थांची । पाहूनि स्थापना मूर्तीची। दत्ताच्या स्वतःजवळची । तेथेंच करविती ॥५॥

एक **भु**-क्त सदा राहती । धार्मिकांसीच भिक्षा मागती। पायींच मार्ग सर्व क्रमिति। लाविती लोकां सन्मार्गे ॥६॥

कीं क-**ज्ञा**-स्च[1] तपस्तेजें । स्वात्मैश्वर्ये सदा विराजे। जोडिती पाणी रंकराजे। परकाजें झिजवी तनू ॥७॥

तद- **नं**-तर जालवणीं । पादुका जवळच्या ठेवूनी । बजरंगगडा लक्षुनी । जातांना वृष्टीनें ॥८॥

दिला **वा**-टेंत बहु त्रास । भिजून झाले चिंब खास । ग्रामीं एका विप्रगृहास । आश्रयास जों येती ॥९॥

विप्र **गु**-णी अग्निहोत्री । नसतां गृहीं त्याचे पुत्रीं । यद्वातद्वा बोलूनि रात्रीं । बाहेरीं काढिलें त्यां ॥१०॥

ते को- **णा** कांही न बोलती । वृक्षा तळीं घेऊन विश्रांति । पर्जन्य थांबता पुढें जाती । विप्रसुत तों इकडे ॥११॥

भ्रमा- **न्वि**-तसा वेडेचार । करुं लागला अनिवार । चहूंकडे फिरे अस्थिर। कर्ममार चुके केवीं ॥१२॥

येता **तं**-व घरीं पिता । पत्नीनें सर्व वृत्त सांगता । दीड वर्ष शोध करितां । लागला पत्ता श्रीगुरुंचा ॥१३॥

धरी **वि**-द्वद्विप्र तो पाय । क्षमा मागूनि पुसे उपाय । देवापराधें वेडा होय। पुत्र, काय करुं प्रभो ॥१४॥

नाहीं **मू**-र्खत्वें ओळखिलें । म्हणून ऐसें अघटित झालें । पश्चात्तापें उर पोळलें । जाणूनि द्रवलें श्रीचित्त ॥१५॥

त्या मू- **ढा** श्रोत्रियकुमारा । उपाय सांगूनि केला बरा। जयजयकार सर्वत्र झाला । पिछोराग्रामीं येती पुढें ॥१६॥

तेथें **ना**-ना लोक देख । येतां शरण त्यांतील एक । अपस्माररोगें दुःख । भोगितां कष्टला बहू॥१७॥

आज्ञे- **नु**-सार त्या भास्करें । करितां नारायणबलि काळें । रोगमूळ पिशाच उद्धरे । झाले बरें तेणें तया ॥१८॥

हो कां **प**-रांचे निवासस्थान । न करावी तेथें कोणी घाण । पुण्यवृक्ष देवस्थान। संनिध शौचादि न करावें ॥१९॥

अव- **श्यं** होतसे दुःख । धर्मातिक्रमें ऐशा देख । ऐसें बोधिती तेथें सम्यक । शास्त्रोक्त उपाय सांगुनि ॥२०॥

टीपः- १. सूर्य

वा.स. ॥२३॥

जातां **ति**-थून खरेऱ्यास । चिटनीस स्त्री दर्शनास। येऊन प्रारंभ पूजेस । करितां देहस्थ जिंद तो ॥२१॥
बोले, **प**- तीचें करीं मशीदीचा । जीर्णोद्धार इचे करवा साचा। केला भंग पवित्रतेचा । त्याचा सूड घेतों मी ॥२२॥
अव- **श्यं** मीच इचे तीन । गर्भस्थ मारिले भ्रूण । आलों देवा तुजसी शरण । भिन्नभाव नाहीं तुला ॥२३॥
श्रींनी **ति**-चे पतीकडून । करवितां तथा, जिंद तूर्ण । सोडी तिला पुढें जाण। प्रसवे तनय ती काळें ॥२४॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
नास्तिकशिक्षणं नाम त्रयोविंशोऽध्यायः समाप्तः ॥२३॥ ओंव्या ॥२४॥

# अध्याय २४

पुढे **ज्ञा**-नीश काशीस जातां । मार्गीं घोर अरण्य लागतां । भिल्लरूपें दत्ते दावितां । वाट सत्वर पोंचले ॥१॥
तेथू- **न** जालवणीं येती । उपनिषदादि ऐकविती । दासनवमीस वाचिती प्रीतीं। दासबोध लोकाग्रहें ॥२॥
श्री वा- **च**-तांच ग्रंथ प्राकृत । शास्त्री तत्रस्थ खवळत । दावितां त्यांत श्रुतिसमानार्थ । गलितगर्व झाले ते ॥३॥
झाला **क्षु**-ण्ण[1] भाषाभिमान । करितां गुरुचरित्र वाचन । गेला गृहींचा ब्रह्मराक्षस जाण । बाणतां प्रचीत भक्त होती ॥४॥
जें उ- **ष:**-कालतैंनाश तिमिरा । उडे नास्तिकता पाहतां गुरुवरा । तेथून कुरुक्षेत्र गोकुळ मथुरा। करुन हरिद्वार आलेश्री ॥५॥
झाला **य**-दा चातुर्मास पूर्ण । शंकराचार्यांची आज्ञा घेऊ न। भालोदस्थ लोकांसह तूर्ण। बद्रिनारायणा निघाले ॥६॥
त्यांचे **तं**-त्रें मार्गीं चालतां। विप्र बळवंतराव तत्वतां। पडला आजारी शीत बाधतां । सोमलगुटिका खाई तो ॥७॥
मागे **तो**-य[2] सुकला गळा । वाढे उष्मा बेशुद्ध पडला । संगस्थ मेळा भिऊन पळाला। आला कळवळा गुरुरायां ॥८॥
स्वयं **यो**-गिवर्य जुलाबानें। बिघडतां तद्वस्त्रें घुती यत्नें । सेवा करितां महाप्रयत्नें । आलें भान तया अल्प ॥९॥

टीपः- १.चूर्ण; नष्ट २. पाणी

गेली गि-रा[1] बोबडी वळली। मरणवेळा येऊन ठेपली । जाणून श्रींनी तार करविली । बोलवाया तत्पुत्रा ॥१०॥
येऊ- न पोंचे तों पर्यंत । जीवनकाळ श्री लांबवीत । येतांच पुत्र सोंपिती त्याप्रत । निवेदूनि वृत्त तद्वस्तू ॥११॥
अंत- श्चै -तन्य तत् क्षणीं लोपलें । मुला देखत प्राण सोडिले । और्ध्वदैहिकादि केलें । भल्या रीतीं सत्पुत्रें ॥१२॥
तद- नं-तर बद्रिनारायण । वंदून करिती एकटे प्रयाण । उत्तराखंड यात्रा करुन । ब्रह्मावर्ती पातले ॥१३॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
सेवाधर्मकथनादि नाम चतुर्विंशोऽध्यायः समाप्तः ॥२४॥ ओंव्या ॥१३॥

## अध्याय २५

गण- प-तिबुवा म्हणून । सत्तावनींचे बंडकाळीं जाण। होते एक साधू महान । तेथें प्रसिद्ध, तत्पुतण्या ॥१॥
अस्पृ- श्य भ्रष्टत्वें यवन। होऊन नेण्या पत्नी लागून । येतां आली ती शरण । श्रीचरणां ते काळीं ॥२॥
सद्ग- न्त्या असदाचरण । करूं नये कधीं जाण । येतां पतीतें भ्रष्टपण । प्रायश्चित्ताविण शुद्ध न ॥३॥
ते आ-त्म-ज्ञ तैसा शास्त्रार्थ । देतां पतिसंगें ती न जात। ब्रह्मावर्तीं काळ क्रमीत । भजनरत सर्वदा ॥४॥
[2]जघ- न्य पिशाच पीडी अति । पांचवर्षीय तत्सुता प्रति। जाणितां श्रींनी बांधिलें हातीं। मंत्रित त्याचे यंत्र एक ॥५॥
तेणें व-र्ते भिऊन भूत । एकदा विटाळशी होतां मात । यंत्र सोडवूनि पुत्रा घेत । तो त्या भूतें आक्रमिले ॥६॥
पुत्र स्थि-ती भयंकर । होऊनि मरे तो सत्वर । मोठा पुत्र वेडापीर । भ्रतार भ्रष्ट जाहला ॥७॥
बोले तं-व पिशाच स्वप्नी । पूर्व जन्मींची तूं माझी ऋणी । दीड रूपाया घेतला झणीं । तों न देतां ही दशा ॥८॥
ऐसें य-दा पडे डोळां । तेंव्हां खरें वाटे सकळां । घेतलें ऋण त्रिकाळां । बुडवूं नये म्हणून ॥९॥
श्रींचा त-था मुक्काम तेथ । असतां नर्मदा द्रष्टांत देत। तथापि गंगातट न सोडीत । रेवातटीं येत ना ॥१०॥

टीपः- १.वाचा २. नीच

अस- **न्तो**- ष देवास झाला । देहीं विस्फोटक उद्भवला । स्नानस्तवनें गंगेला । तोषविल्याही न शमे ॥११॥
तथा- **प्य**-न्तरीं न कळलें । गंगाविश्वेशां पुनःस्तविलें । स्वप्नीं देवें सांगितलें । रेवातीरीं जा कसा ॥१२॥
तिच्या **कृ**-पेनें त्रिदिन स्नान। करितां तन्नीरीं निश्चयें जाण। होईल शांत हा रोग दारुण। अन्योपाय न चले॥१३॥
आज्ञा **ता**-बडतोब घेऊन । गंगेची निघाले तत्क्षण। मार्गीं निमावरा संनिध जाण । हरणगांवीं आश्चर्य ॥१४॥
शुद्ध- **त्मा** ते देखती एक। सर्व ग्राम जळलेलें देख। असतां एकचि घर मध्यें सम्यक। कारण काय पुसती ते ॥१५॥
न मा- **नो**-नि सत्पुरुष। अन्नेविण परतविला खास। क्षुधार्ता एक महापुरुष। तद्दोषें गांवाची ही दशा ॥१६॥
एके- **नै**- गमाज्ञा[1] पाळितां । अभ्यागता त्या अन्न देतां । राहिलें तद्गृह तत्वतां । मध्यस्थही नाथा हें ॥१७॥
ब्रह्मा- **नं**-द मग्नही स्वामी । ऐकतां हळहळले अकामी । लावूनि लोकां गृहस्थधर्मी । नर्मदातटाकीं पातले ॥१८॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
नर्मदातटागमनं नाम पंचविंशोऽध्यायः समाप्तः ॥२५॥ ओंव्या ॥१८॥

# अध्याय २६

भावें **प**-तितपावनीतें । वंदून राहिले त्रिदिन तेथें । स्नान त्रिकाळ करितां ते । विस्फोटकमुक्त जाहले ॥१॥
आव- **श्य**-क कर्म सारुन । पुनः पुनः स्तवन वंदन । जय जय नर्मद... नीराजन । करुन आले ब्रह्माणा ॥२॥
अचि- **न्त्य** नर्मदेची लीला । घाट चढतां पाय लचकला । पाउल न टाकवे त्यांला । झाला काळ मध्याह्न ॥३॥
शून्य **चे**-ष्ट स्वारी बैसली । कन्यकारुपें नर्मदा प्रगटली । भस्म चोळून लचक उतरली । झाली गुप्त तत्काळ ॥४॥
हांस- **त** देखून गुरुवर । म्हणती भावना तैसें फळ । आणूनि माधुकरी सत्वर । खाती अर्पून नैवेद्य ॥५॥



टीपः- १.वेदाज्ञा.

निवा- **स:** पुण्यदो ह्यत्र[1] । ऐसें मानूनि राहतां तत्र। घडलें एक वृत्त विचित्र। त्यागिती स्थळ तेणें तें ॥६॥
द्रव्य **य**-थेष्ट घेऊन । तीनतीनदां करी लग्न । निज कन्येचें एक ब्राह्मण । देखून भ्रष्टपण त्याचें ॥७॥
श्री त -**दा** तत्रस्थां सांगती । शिक्षा करण्या त्या विप्रा प्रति । बहिष्कृत करा म्हणती । न ऐकतां निघाले ॥८॥
अन्ना- **दि** ही न घेतां तत्क्षण । गांव सोडिती होतां मध्याह्न । मार्गी विश्रांति घेतां जाण। वदे प्रगटून नर्मदा ॥९॥
भो[2]स- **त्य** प्रतिज्ञ स्वामी । येऊन रहा माझे ग्रामीं। भिक्षा सुलभ तेथें धामीं। ब्राह्मणांचे सप्तदश ॥१०॥
त्यां अ-**ग**-त्यें ऐसें सांगून । झाली बालिका अंतर्धान । जवळींच निमावरीं जाण। जाऊन पाहतां श्री ॥११॥
घरें **तं** -तोतंत जुळलीं । कन्या मात्र न देखिली । अंतरीं खूण पूर्ण पटली । राहिली स्वारी तेथें तथा ॥१२॥
ऐसें **तें**-थें किंचित् राहून। लोकां सन्मार्गीं लाविलें जाण । सिद्धनाथदर्शन घेऊन । धावडीकुंडा पातले ॥१३॥
जेथें **जो**-टिंग[3] शिवाचे बाण। निघती मनोज्ञ सनातन। घेतां कित्येक श्री जाण। अडवी भोळानाथ भिल्ल ॥१४॥
लीला **ज**-गीं देवभक्त-। रूपें ऐसी दाखवीत। ओंकारममलेश्वरा प्रत । लोकोद्धारार्थ येती त्वरें ॥१५॥
शास्त्र- **ग**-त रहस्य दाविती। कारभाऱ्या कर्म शिकविती । महेश्वरादि मार्गें पुढतीं। चिखलद्या प्रति पातले ॥१६॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
देवभक्तलीलाकथनं नाम षड्विंशोऽध्यायः समाप्तः ॥२६॥ ओंव्या ॥१६॥

## अध्याय २७

जग- **भ्दा**-स मिथ्या जाणून । पत्नीमरणें येतां शरण। व्यंकटविप्रा प्राणायामादि जाण। शिकवून सन्मार्गीं लाविती ॥१॥
येता **स**-ण दीपवाळी तथा। करून अभ्यंगस्नान निमित्ता। सगुणभक्तिरहस्य तत्वतां । भक्तां देवें दाखविलें ॥२॥



टीप:- १.येथे रहाणे पुण्यप्रद आहे. २. हे ३. भूतनाथ

नाहीं **य**-दा म्हटलें श्रींनी । मूर्ति दडाली जळीं जाउनी। नैवेद्य अर्पावया मध्याह्नीं । पाहतां नयनीं दिसे ना ।।३।।
ध्यानीं **ते** -व्हां पाहतां कळलें । लोकां बोलावून आणिलें । सुगंधी द्रव्यांसह वाहिलें । प्रार्थिलें देवा सर्वांनीं ।।४।।
तों अ- **खि**-ल ब्रह्मांडनाथ । मूर्तिमुखें ओ देऊनि बोलत। काढोनि मंगलवाद्ये सहित। पूजति सुगंध द्रव्यें श्री ।।५।।
निरा- **लं**-ब भावनाबळें । प्रगटे जडालंबीं त्वरें। देखतां प्रत्यक्ष जयजयकारें। वंदिलें सर्वीं त्र्यधीशा ।।६।।
कीर्ति **य**-दा पसरली फार। तेथून श्री निघाले सत्वर। पावन करण्या देश गुर्जर। तिलकवाड्यास पातले ।।७।।
अत्यु- **च्च**-शील मणिशंकर। निपुत्रिक तत्रस्थ द्विजवर । देखून सर्पवध प्रकार। पूर्वजन्मींचा सांगती ।।८।।
[1]अही- **न्द्र** तुष्ट्यर्थ व्रत । पंचमीचें नागबलि सहित। दंपती हस्तें विधिवत्। करवितां पुत्र त्या झाला ।।९।।
ऐसे **म**-हा चमत्कार । पाहूनि आर्तादि सकळ। धांवतां तेथून सत्वर। अनसूयाश्रमीं येती श्री ।।१०।।
माते- **सि** चतुर्विंशति नामीं । स्तवूनि आले शिनोरग्रामीं । तेथें मार्कंडेश्वरधामीं। ब्रह्मकामी गांडाबुवा ।।११।।
येता **य**-द्रच्छया शरण । उभय निकोऱ्या लागून । येऊन योगाभ्यास कथन । करुन तयां तत्संगें ।।१२।।
श्री उ- **च्चा**-वच[2] मार्गीं चालतां। आले गीरनारीं तत्वतां । वंदून दत्तपादुका तथा। सोमनाथ पातले ।।१३।।
संल- **ग्नै**-पनिषद्ज्ञानीं । बाळंभट्ट पुजाऱ्यानीं । ठेवून घेतां राहिले ध्यानीं। अल्प दिन प्रभासीं तें ।।१४।।
फिर- **त** फिरत तेथून । आले द्वारिकाक्षेत्रीं जाण । श्रीकृष्णातें वंदून । चातुर्मास पूर्ण करिती ।।१५।।
भास्व- **ते**-जें विराजती । सर्वत्र लोक सन्मानिती । पावन करीत तीर्थांप्रति। मातृगयेतें पातले ।।१६।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
सगुणभक्तिरहस्यकथनं नाम सप्तविंशोऽध्यायः समाप्तः ।।२७।। ओंव्या ।।१६।।



टीपः- १. नाग २. उंचनिंच.

# अध्याय २८

वा.स. ॥२८॥

मुनि **जो** कर्दम विख्यात । तत्तपें तुष्ट विरिंचितात[1]। सरस्वतीतटीं प्रगटे जेथ । तें हें क्षेत्र सिद्धपुर ॥१॥

हर्ष **वि**-शेष विष्णूतें । होतां अश्रुबिंदू जेथें । स्त्रवले, बिंदुसरोवर तें । करितीं स्नान तेथें श्री ॥२॥

जे शु-**द्धि** परां दर्शनें देती । लोकशिक्षणा विधि आचरिती । कर्दमपत्नी देवहूती । कपिल तत्सुत विष्ण्वंश ॥३॥

देण्या **मा**-तेसी सांत्वन । घेतां मुनि संन्यास जाण । करुनि सांख्यशास्त्र निर्माण। कथी ज्ञान जो सुधी ॥४॥

ज्ञानी **म**-हासिद्ध तो कपिल । त्याचें पुर तें सिद्धपुर । पडतां मातेचें शरीर । और्ध्वदैहिक करी येथें ॥५॥

मातृ- **कं**-काला[2] पहिलें । मूळपुरुषें येथें संस्कारिलें । म्हणून प्रसिद्धीतें पावलें । मातृगयानामें हें ॥६॥

जल- **गा**-हनें बिंदुसरीं । मातृश्राद्धें सरित्तीरीं । सपितर मातृत्रय उद्धरी । होई पुत्र ऋणमुक्त ॥७॥

महि- **मा** जाणून श्री तेथ । हाटकेश्वरीं राहती मस्त । ब्रह्मचारी एक यात्रार्थ । आला कर्णाटकी तेथें ॥८॥

होता **वि**-शेष सुकुमार । अन्नादि न मिळतां निर्मळ। व्याधिग्रस्त होऊनि सत्वर । पंधरा दिनीं आटपला ॥९॥

अव- **श्य** नाहीं जगणार । ऐसें जाणूनि श्रीगुरुवर । गांडाकरें अन्नाद्युपचार। तोंपर्यंत करविती ॥१०॥

योग **च**-र्येनें प्राणोत्क्रमण । करविती संनिध राहून । धन्य भाग्य तयाचें जाण । अंतीं श्रीचरण लाभला ॥११॥

सर्वां **भू**-तीं नारायण । भूतदया धर्म प्रधान । स्वाचरणें लोकां शिकवून । डाकोरा लागून आले पुढें ॥१२॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां मातृगयाख्यानं नाम अष्टाविंशोऽध्यायः समाप्तः ॥२८॥ ओंव्या ॥१२॥



टीपः- १. विष्णु २. मृतशरीरास्थि.

# अध्याय २९

वा.स. ॥२९॥

पूर्वी **ता**-पस डंक ऋषि । तपें तोषवी वनीं शिवासी । तद्वरदानें त्या रानासी । नगरशोभा आली पुढें ॥१॥
वसे **नि**-त्य कैलासनाथ । नामें तेथें डंकनाथ । डाकोर म्हणती ग्रामा प्रत । भक्त बौढणा विजयसिंह ॥२॥
बहु- **धा** सातशें वर्षां वर । होऊन गेला तेथें प्रखर। द्वारिकाधीश कृष्णावर। निष्ठा अचल असे त्याची ॥३॥
द्विवा- **र** वर्षांत द्वारकेसी । भगवत्पदीं अर्पण्या तुळशी । बाळपणापासून जातां त्यासी । वृद्धावस्था पातली ॥४॥
कधीं **या** नियमा न खंड । मुखीं कृष्णनाम अखंड। चाले पायीं तप प्रचंड । करितां दंड[1] वांकला ॥५॥
अद- **म्य** भक्त्युत्साह त्याचा । पाहून राणा द्वारकेचा। तोषून एकदा म्हणे वाचा। नाहीं त्वद्देहाचा भरंवसा ॥६॥
आणीं **ह**-ळूच कांहीं यान । करुं तुज संगें प्रयाण । ऐकोनि भक्त हृष्टमन । मागून आणीत शकट एक ॥७॥
गाडा **मो**-डका म्हातारे बैल । द्वार बंद निशीथ[2] काळ । थकला भक्त, श्रीगोपाळ। चमत्कार करी कैसा ॥८॥
येतां **ज**-वळ बौढाणा। उघडे किवाड धांवे कान्हा। भेटून भक्ता चढे याना। म्हणे लगाम दे मला ॥९॥
करी **सा**-रथ्य पाषणामूर्ती। वरी प्रेमें विधविध गोष्टी। धन्य बौढणा अपूर्व भक्ति। देवेर्ष्य स्थिती पार्थाधिक[3] ॥१०॥
जातां **पु**-ढें देवभक्त । पाहतां प्रभातीं रिक्त तख्त । मांडिला एकचि आकांत। द्वारकेंत लहानथोरीं ॥११॥
हा कृ- **ष्णा** कोणी चोरिलें । बंद द्वार कैसें उघडिलें । दहा मणाची मूर्ति स्वबळें। कोण कैसा उचलूं शके ॥१२॥
ऐसा **मि**-ळूनि सर्व शोक। करितां आचार्य म्हणती निःशंक। भक्तिवश श्रीवत्सांक । गेला डाकोरा भक्तासवें ॥१३॥
नसे **चौ**-र्य कोणी केलें। ऐसें ऐकूनि गुगळी धांवले। जाणोनि सरोजळीं[4] लपले । डंकनाथा जवळीं श्रीरंग ॥१४॥
जेथें **ष**-ड्गुणैश्वर्य लपला। आला तेथें ब्राह्मणमेळा। पुसे न देखतां धननीळा । बौढाण्याला, कोठें हरि॥१५॥

टीपः- १. मेरु दंड, पाठीचा कणा. २.मध्यरात्र ३. अर्जूनाहून जास्त ४. सरोवराच्या पाण्यांत.

म्हणे **धी**-र होता येथें । कोण जाणे गेला कोठें । शोधतां सरीं अति नेटें । भेटला रक्त भाल्याचे ॥१६॥
सर- **स्स**-र्व धुंडाळिलें । बौढाण्याकरें देवा काढिलें । बाहेर येतां हरि बोले । राहिणें मला येथेंच ॥१७॥
तैं श- **र्वा** संनिध[1] तोलून । लोभें मागतां विप्र सुवर्ण । गंगाबाई पत्नी तूर्ण । नाकींची नथ पुढें ठेवी ॥१८॥
[2]रह- **स्सो**-त्कंठ देवा प्रार्थुन। सवा वालाची नथ सुवर्ण। मूर्तीसी तुलेंत तुकितां जाण। तुके वजनें अधिक ती ॥१९॥
धाय **मो**-कळून रडती विप्र। बौढाणमुखें देव क्षिप्र । वदे तयांसी सावित्रीविहीर। द्वारके जवळ असे जी ॥२०॥
तींत **भू**-रितेज[3] माझी मूर्ति। असे ऐसीच, काढून ती। स्थापा द्वारकेंत निश्चितीं। व्हाल सुखी तत्सेवनें ॥२१॥
मम- **त्वा** सोडून ते जाती । तैसें करुन सुखी होती। आली मूर्ति डाकोरा प्रति। शरत्पूर्णिमेला तथा ॥२२॥
होतो **र**-म्य महोत्सव तद्दिनीं। प्रतिपौर्णिमेलाही ऋणमोचनी। रणछोडरायाचे दर्शनीं। धांवती जन असंख्यात॥२३॥
भक्ति **सा**-मर्थ्यें क्षेत्र वाढलें। द्वारके सारिखें प्रसिद्ध झालें। पुढें भव्य मंदिर बांधिलें। तांबेकरें देवाज्ञेनें ॥२४॥
जे आ- **त्म**-निष्ठ यति पूर्ण। तेहि माहात्म्य ऐसें जाणून । सेविती डाकोरनाथचरण । राहून अल्प काळ तेथें ॥२५॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
डाकोरमाहात्म्यं नाम एकोनत्रिंशोऽध्यायः समाप्तः ॥२९॥ ओंव्या ॥२५॥

## अध्याय ३०

वनौ- **क:** श्रेष्ठ[4] तेथून येती । महत्पुरीं वस्ती करिती। दत्तपुराण-माहात्म्यनिर्मिती। करिती तेथें चतुर्मासीं ॥१॥
उच्च **अ**-भ्यासा खेचरीचे । करण्या छेदन जिह्वेचें । ताटके गुणाकटकींचे। त्यांचे पासीं गांडातें ॥२॥
दुर- **हं**-ता[5] सोडून जा म्हणती। तैसेंच अप्पा व्यंकटाप्रति। होतां छेदन नर्मदातटीं। राहा म्हणती अभ्यासा ॥३॥



टीपः- १. डंकनाथ महादेवाचे जवळ २. एकांती. ३.अतितेजस्वी ४. तापसश्रेष्ठ ५. रिकामा अहंकार

वा.स.
।।३०।।

दैव वै-विध्यें त्रिप्रकार । झाले तिघांचे साचार । होतां शस्त्रक्रिया तत्काळ । आज्ञेनुसार गांडाबुवा ।।४।।
सद्वि- श्वा-सें भडोचक्षेत्री। समशीतोष्ण रेवातीरीं । येऊन पुढील अभ्यास करी । झाली सांगता गुरुकृपें ।।५।।
भयें न जाती दोघे जण । राहती ब्रह्मावर्तींच जाण । दैवें व्याधिग्रस्त होऊन । अप्पा प्राण त्यजी त्वरें ।।६।।
दुज्या रो-ग अतिसाराचा । जडला अन्नदोषें साचा। धरीं मार्ग नर्मदेचा । लोभ देहाचा धरुनि ।।७।।
पुढें भू-तांतकें[1] ग्रासिला। श्वासकासें व्याकुळ झाला । आज्ञाभंगें प्राणास मुकला । चुकला गुरुसांनिध्यही ।।८।।
अहं- त्वा-नें ब्रह्मावर्तांत । वसे सुभेदार नामें श्रीमंत । देत साधूं तें सदावर्त। घेतां काष्ठें दंडी त्यां ।।९।।
देवा प्रा -र्थूनि श्राप देती । साधू त्यावरी क्षुब्ध होती । तेणें विपन्नावस्था अंतीं । झाली प्राप्त सुभेदारा ।।१०।।
[2]द्युम- णि सारिखा ज्येष्ठ भ्राता। ग्रसिला काळें पाहतां पाहतां। मध्यरात्रीं श्रींनी एकदां। घरांतून जातां तयांच्या ।।११।।
श्मशा- नां-त देखिली दिव्य अंगना। लक्ष्मीच ती ऐसें वाटूनि मना। येतां पुतण्या माधव दर्शना। सांगून सर्व म्हणती तया ।।१२।।
वाटे दे-व तुम्हां वरी रुसला। जपा नीट सर्व सांभाळा। प्लेगही ग्रासील गांवाला । जा बाहेर सर्व तुम्हीं ।।१३।।
संदे- ह धरुनि तो घरीं। निजतां मेला प्लेगें सत्वरीं। निपुत्रिका त्याची नारी। आणि चुलतीही तैसीच।।१४।।
भाग मा -गती सुभेदारा। भांडतां पैसा गेला सारा। अन्नवस्त्रा न राहिला थारा। लागला भिकेला सुभेदार ।।१५।।
गृह्या- श्रि-त[3] सर्व संसार। न करावा कोणाचाही छळ । साधुछळें ऐसें अनिवार । दुःख साचार येतसे ।।१६।।
जो अं- त: कामें असे पीडित । विष्णुबुवा पालघरस्थ । पत्नी मरतां फिरत फिरत। ब्रह्मावर्तीं पातला ।।१७।।
राही प्रा-र्थून श्रींते तेथ । सोडून घरदार आप्तेष्ट। एकदां सुंदर स्त्री द्रष्टिंगत । होतां कामें व्यापिला ।।१८।।
न को- णा सांगता दूर गेला। डोळ्यांत रुईचा चीक भरला। करण्या शिक्षा अधम नेत्रांला। झाला आंधळा अविचारें ।।१९।।
तैं श्रीं- पा -सीं वृत्त पोंचलें । दयार्द्रनेत्र धुवविले । दिव्यौषध अंजन केलें । गेलें अंधत्व समूळ ।।२०।।



टीपः- १. यमानें, मृत्युनें २. सूर्य ३. गृहस्थाश्रित.

वा.स. ॥३१॥

आला न-मन करण्या श्रीपदीं। एकांत साधूनि बोधिती तधीं। सुधादृष्टींने पाहतां शुद्धि। झाली चित्ताची तत्क्षणीं॥२१॥
मना- स लागला रोग दंभ। न काढितां तो वृथा क्षोभ। करुनि दंडितां इंद्रियां, लाभ। होण्याचा संभव नसे कीं ॥२२॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
विविधवृत्तकथनं नाम त्रिंशोऽध्यायः समाप्तः ॥३०॥ ओंव्या ॥२२॥

## अध्याय ३१

कैंक मा-स ब्रह्मावर्तीं । राहून वाडीसी जाती। दत्ताज्ञेनें पुजाऱ्यां प्रति । देती नेमून पूजाक्रम ॥१॥
मान- यु-क्त मानिती कैंक। बंडूतुकारामादि साशंक । होऊन उडवितां निंदापंक। भोगिती क्लेश संतत ते ॥२॥
विद्यु- क्तः सुखमेधते[1] । ऐसें जाणून प्रपंचातें । त्यागून नारायण दीक्षितें । वाडीस्थें गुर्वाज्ञया ॥३॥
वास प-वित्र कृष्णातीरीं । केला होता धर्मशाळे भीतरीं। स्त्रीपुत्रा सह भिक्षेवरी। चरितार्थ चालवून ॥४॥
विप्रा- चा-रें राहतां तेथ। प्रारंभीं लोक निंदा करीत । पाहून शांत समाहित चित्त। वंदूं लागले तेचि पुढें ॥५॥
अग- म्य असे देवलीला । काळें पत्नीसुतां अंत झाला । दीक्षितें तेव्हां गुरुमाउलीला। संन्यासार्थ प्रार्थिलें ॥६॥
भिक्षा न्न भजनेंचि पचे । अन्यथा फुटोनि निघे त्वचें । करवून भान नियमांचे । काषाय चैल[2] दिलें विप्रीं ॥७॥
प्रप- श्च ब्रह्ममय झाला । देतां दंड श्रींनीं त्यांला। वाडींत राहून लोकांला। लाविलें धर्मीं बहु त्यांनीं ॥८॥
होता तु-र्यावस्था प्राप्त। ज्ञानें जीवन्मुक्ति भोगीत। विचरत निःसंग अयोध्येंत। झाले समाधिस्थ ते काळें॥९॥
न दु- विं-चार कधीं त्यांना। दीक्षित नृसिंहसरस्वतींना। श्रींचे पट्टशिष्य या माना। पावले पुण्यबळें कीं ॥१०॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
नृसिंहसरस्वत्युद्धरणं नाम एकत्रिंशोऽध्यायः समाप्तः ॥३१॥ ओंव्या ॥१०॥



टीपः- १. ज्ञानवान सुख पावतो २. वस्त्र

# अध्याय ३२

ज्यांना धं-दा नसे अन्य । निंदेसी प्रवर्तती ते जघन्य। गुरुसेवक जो अनन्य । धन्य धन्य त्रिलोकीं तो ॥१॥
वाडी- स असतांना श्री तदा। तात्या जहागीरदार एकदा। कौठागुलंदग्रामींचे श्रीपदा । आले दर्शना पत्नी सह ॥२॥
अग- र्व दोघें वंदिती । नम्रभावें तात्या म्हणती । नाहीं देवा मजला संतति। व्हावी दया दयासिंधो ॥३॥
सहा- स्य वदती श्री तयां। अरे ही वंध्य तुझी जाया। तात्या म्हणती तरी वांया। कासया लग्न लावविलें ॥४॥
ब्रीदा- चा घ्यावा सांभाळ। ऐकून ऐसें गुरु दयाळ। देती प्रसाद दोघां नारळ। वंदून सत्वर निघालीं तीं ॥५॥
निर- हं-कारें वाट चालती। मार्गीं श्रींची छबी देखती। घेऊन येण्या उपाध्यास सांगती। आणितां ती नावडे ॥६॥
नाहीं हृ-द्य[1] आणा दुसरी। ऐसें म्हणून ती बदलविली। रात्री जेव्हां दोघें झोपली। म्हणती श्री स्वप्नीं तयां ॥७॥
आणा दि- लेला प्रसाद मागें। रुप माझें कडु लागे। प्रसाद कैसा गोड लागे । मागें नारळ घेती तथा ॥८॥
दोघें- सं-तप्त जाग्रत होती। पूर्वीचीच छबी मागविती। पुनः श्रीपदीं दर्शना येती। सांगती सर्व स्वप्नवृत्त ॥९॥
हासो- नि पुनः नारळ देतां। समाधान होत त्यांचे चित्तां । पंचेचाळिसावे वर्षीं तत्वतां । प्रसवे पत्नी कन्येतें ॥१०॥
वंश वि- स्तारक पुढें सुत । होतां आनंदें वाडी प्रत । जाऊनि दोघें श्रीपदीं घालीत । कन्यासुतां दंपती ॥११॥
अरि- प्रो-चंड वंध्यत्वादि । नासतां गुरुकृपेनें तधीं । जयजयकार झाला त्रिशुद्धीं । लोकमांदी धांवली ॥१२॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां वंध्यापुत्रप्रदानं नाम द्वात्रिंशोऽध्यायः समाप्तः ॥३२॥ ओंव्या ॥१२॥



टीपः-१. सुंदर.

# अध्याय ३३

वा.स. ।।३३।।

संग- **म** स्थानीं गाणगापुरीं । जाती तेथून श्री लौकरीं । धरितां दत्तध्यान अंतरीं। प्रगटे मूर्ति समोर ।।१।।

[1]स्वाय-**त्त** करुनि चित्त। प्रार्थितां वदे प्रत्यक्ष दत्त । तुवां येथें न रहावें बहुत। प्रयाण सत्वर करावें ।।२।।

श्रृति- **स्स्मृ**-तिशास्त्रगर्भ । ऐसें बोलून देव स्वयंभ । अद्रश्य होतां अंबोद्भव[2] । धर्मस्तंभ निघाले ।।३।।

पुढें **ति**-ग्मतेज शीघ्रगति । कयाधूतीरीं नरसीप्रति। येऊन चातुर्मास्य करिती । इकडे वाडींत रुसे देव ।।४।।

अंत- **र्ज्ञा**-नें श्रींनी जाणिलें। इतुक्यांत पुजारीही आले। पालखींतून देव उसळे। पडे कैसा भूवर ।।५।।

सांगू- **न** तें सर्व वृत्त। करुणा भाकिती बद्धहस्त । म्हणती श्री तुम्हीं उन्मत्त । होऊन भ्रष्टपणें वागां ।।६।।

निय- **म** माझे न पाळितां । देव क्रुद्ध झाला आतां। करुणात्रिपदीनें प्रार्थितां । नित्य, शांत होईल तो ।।७।।

दृढ **पो**-त[3] भवतारण। दिगंबरा दिगंबरा[4]..भजन। ऐसें सांगतां तत्सम वर्तन। करुन सुखी झाले ते ।।८।।

निर्मो- **ह** श्री तेथें असतां। कयाधूतीरीं स्नानार्थ जातां। बाळ-स्वरुपें दत्त तत्वतां। नित्य क्रीडार्थ येतसे ।।९।।

अत्या- **नं**-दें तदा बाळा। घेऊन अंकीं[5] श्री तयाला। खेळवितां चुंबनादिप्रकारा। पाहिलें दूरस्थ भंगिणीनें ।।१०।।

तीतें **चु**-पल नेत्रें पाहतां। पाहून चमकले श्री चित्तां । इतुक्यांत दत्त तत्वतां । अंतर्धान पावले ।।११।।

न नि- **वे**- दीं हें कोणातें । ऐसें श्री सांगती तीतें । तरी स्त्रीस्वभावें लोकांतें । कथिलें वृत्त तें तिणें ।।१२।।

स्वामी **दै**-व शाळी हा मुलें । नदींतून काढून नित्य खेळे। करी तयां सह स्नेहें चाळे। पसरतां वृत्त श्री तदा ।।१३।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां बालदत्तक्रीडनं नाम त्रयस्त्रिंशोऽध्यायः समाप्तः ।।३३।। ओंव्या ।।१३।।



टीपः- १.स्वाधीन; आत्मनिष्ठ २. अंबापुत्र, नृसिंहसरस्वती ३. नाव ४.दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा ५. मांडीवर

# अध्याय ३४

वा.स. ॥३४॥

सुनि- श्री-यें तेथून सत्वर । ब्रह्मावर्ती येती काढून पळ। कुशोबा नामें एक द्विजवर। व्रणपीडित असे तेथें ॥१॥

हात स-डला दुर्धर व्रणें। त्रासला कुशोबा अति तेणें । सांगतां श्रीनी प्रार्थितां यत्नें । देव स्वप्नीं वदे तया ॥२॥

अंत- वै-श्वानरा[1] समान । गोविंदभट्टाचें पूर्वऋण। जाळीतसे तुज होऊन व्रण। देतां तत्क्षण सुटसी तूं ॥३॥

सत्व- र त्यानें गोविंदभट्टा । बोलावून रुपे पस्तीस देतां। झाला व्रणमुक्त तो सर्वथा । मृत्यु सुखें पावला पुढें ॥४॥

ऋण ह-रामाचें न पचे । कुशोबा उदाहरण त्याचें । म्हणून बुडवूं नये कोणाचें । देणें साचें म्हणती गुरु ॥५॥

येता मे-घागम जवळ । जाती प्रयागीं श्री सत्वर । तेथून काशीक्षेत्रीं विमळ। तारकमठीं पातले ॥६॥

स्वामी व-रिष्ठ स्वयंप्रकाश । आत्मैक्यें पूजूनि श्रींनां खास। स्वसंनिध करवितां वास। आग्रहास्तव लोकांच्या ॥७॥

जातां वे-णुकर[2] मध्येंच । पंचक्रोशींतून लगेच। येऊन त्रिवेणीसंगमींच । चारुचरित्र[3] थांबले ॥८॥

गो स- धो-जात[4] वत्सासी धांवे । तैसें निषिद्धान्न त्यागून [5]जवें। भक्तकार्यार्थ देवाज्ञें भावें। जातां वाडीस तेथून ॥९॥

आले वे-गें बडवायीस । राहिले करण्या चातुर्मास । नर्मदातटीं दर्शनास । आले श्रीमंत रंक तेथें ॥१०॥

शांत दां-त शास्त्री पंडित । दूरदूरचे आले बहुत। ब्रह्मावर्तीचे नानाशास्त्री त्यांत। महासमर्थ एक होते ॥११॥

झाली त-यां महामारी तेथें । प्रार्थिती तथा श्री देवातें । जाऊं दे घरीं या बाळांतें। संपतां चातुर्मास निघेन मी ॥१२॥

श्रीच्या कृ-त प्रार्थनेनें। झाले रोगमुक्त नाना तेणें। दीड मासीं गुरुकृपेनें। पोंचले निर्विघ्न घरीं ते ॥१३॥

सुर द्रे-ष्य मृत्यु पावले । महामारी उद्रवून पुनः भले । मरण तोंपर्यंत लांबविलें। गुरुदयाळें अत्यद्भुत ॥१४॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां नानाशास्त्र्युद्धरणं नाम चतुस्त्रिंशोऽध्यायः समाप्तः ॥३४॥ ओंव्या ॥१४॥



टीपः-१. अग्नि २. दंडहस्त ३. सुंदर चरित्र आहे ज्यांचे ४.नुकतेंच जन्मलेलें ५. शीघ्र.

# अध्याय ३५

आले **द**-याघन तेथून । वाडींत ब्रह्मानंदमठीं जाण। ठेवून घेती देवा प्रार्थून । सकळ जन तयां लागीं ।।१।।

रुपें **वि**-विध दाविती । एकें समाधींत बसती । दुसऱ्यानें धोंडोपंतां प्रति। जाती भिक्षार्थ एकदा ।।२।।

लोकां **दे**-ती प्रसाद जाण । तिज्या रुपें प्रत्यक्ष तत्क्षण। जिवंत समाधी पासीं तूर्ण । अंतर्धान पावती ।।३।।

जेव्हां **व**-दती अन्योन्य जन । दावूनि प्रसादादि खूण । जयजयकारें आश्चर्यमग्न। करिती घोष स्वानंदे ।।४।।

देवा- **चा** प्रसाद घेती । गुरुद्वादशीस श्री जेविती । एकादशी पहिली करिती। लोकशिक्षणार्थ देवाज्ञें ।।५।।

स्वयं **हं**-सवत् निर्विकार। देवान्न चोरितां स्त्रीसी मार । मारितां, बटुकवेषें निर्धार । देवें रामभटा ताडिले ।।६।।

हें त- **द्वा**-क्यें सर्वीं जाणिलें। दण्ड प्रहाराचे वळ पाहिले। देवाचें तीर्थ भस्म श्रींनी दिलें । बरें केलें त्वरें त्यासी ।।७।।

ऐसी **वि**-विध लीला वाडींत । होतां नर्कचतुर्दशी येत । अभ्यंगस्नान श्रीं प्रत । घालिती प्रार्थून भक्त तैं ।।८।।

आली **मौ**-ज तदा फार। अर्पूण षोडशोपचार । पूजिती भक्तिपुरः-सर। सारार्तिक्य[1] वाद्यघोषें ।।९।।

पाणी **पु**-जारी अति उष्ण । ओतिती पादुकां वर तत्क्षण। मूत्रद्वारें रक्त जाण । श्रींसी त्यानें पडूं लागे ।।१०।।

बोले **रु**-ष्ट देव तयां । सांगसी कां न पुजाऱ्यां । जाणितां त्यांनीं स्वकार्या । केलें कबूल श्रीं पासीं ।।११।।

सद्रो- **षौ**-षध[2] क्षमा देवा । नाक घांसून प्रार्थिती जेव्हां । उपाधिमुक्त श्री तेधवां। होती भवतारक ।।१२।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
रुपत्रयधारणादिकथनं नाम पंचत्रिंशोऽध्यायः समाप्तः ।।३५।। ओंव्या ।।१२।।



---

टीपः- १. आरती सह २. संतांचे -देवाचे रोषाचें औषध.

# अध्याय ३६

ज्याला **लो**-क वेडा म्हणती । ऐसा बालोन्मत्तजडवृत्ति । करी एक वाडींत वसती । वैजनाथ नामें तदा ॥१॥

पूजा **के**-ली न कधीं त्यानें । माती चोळून नित्य न्हाणें । कृष्णेकांठीं स्वैर फिरणें । हेंचि नित्यकर्म त्याचें ॥२॥

न अ- **क्ष**-र करी प्रार्थना । पुसतां लोक म्हणे त्यांना । ब्रह्मसमंध लागला जाणा । सुचेना कांहीं मला तेणें ॥३॥

लाज **र**-क्षण्या पंचा लहान । घेई निमंत्रित भिक्षान्न । भोजनदक्षिणा पैशाहून । अधिक न घेई दिल्याही ॥४॥

न प- **श्चा**-त्करी[1] कुरकुर । असे त्याला दत्तसाक्षात्कार । पंचवीस वर्षांत केवळ । आठ रुपे दक्षिणेचे ॥५॥

प्रत्य- **क्ष** जमा केले त्यानें । मागातां कोणी तो म्हणे । भावासी भेटण्या मला जाणें । संग्रहून ठेविले तथा ॥६॥

नंत- **र** गांडाबुवा श्रींसी। सांगतां ते म्हणती त्यासी। रहस्य हें न कळे तुजसी । वृथा चिडविसी कां त्यास ॥७॥

जगीं **ए** -कचि ब्रह्मसमंध । दत्त दिगंबर, न देखती अंध । तेणें ग्रस्त वैजनाथ प्रबुद्ध[2] । बंधु मृत्यु जाण तूं ॥८॥

ऐसें **व**-दतांही श्री तदा। गांडा म्हणे पूजा एकदा । करवावीच तद्हस्तें सुखदा। श्री आज्ञेनें वैजनाथ ॥९॥

रुपे **च**-रणीं ठेवी आठ । करूनि सर्व ठाठमाठ । करवितां पूजा श्री साक्षात्। गांव समस्त लोटला ॥१०॥

कृपे- **क्षे**-ण करितां श्रींनी। तीन हजार जेविती क्षणीं। उरलेलें अन्न कृष्णाजीवनीं। टाकूनि जलचरें तोषविलीं ॥११॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां वैजनाथोपाख्यानं नाम षट्त्रिंशोऽध्यायः समाप्तः ॥३६॥ ओंव्या ॥११॥



टीपः- १. पाठीमागून २. प्रखर ज्ञानी

# अध्याय ३७

वा.स. ॥३७॥

भाचा र-डत भूतग्रस्त । जनार्दन गोठसग्रामस्थ । येतां, नारायणबलि वाडींत । करवून मुक्त करिती तया ॥१॥

मन- स्स-माधानें तो गेला । गणेश वाडीकर दुसरा । तात्या शिरोळस्थ आला । निंदूं लागला दुष्टसंगें ॥२॥

तो ग- र्वा-नें श्रींतें बोले । पहा हाता काय झालें । सांगतां औषध, बरळे । कांहीं न कळे स्वामींना ॥३॥

जें को-णि भेटे म्हणे त्यासी। काय लागलां यांचे नादासी । भोंदू केवळ हे ऐसी । हांसून निंदा करी तो ॥४॥

गर्वे भू-लोन परीक्षार्थे। पाहू जातां संतप्रचीत । त्याच हातीं गलत्कुष्ठ । होऊन अंतीं मरे तो ॥५॥

पुढें ता-त्काळ श्री निघती । एलंमादर्शना जाती । किष्किधा, शेषाचला प्रति । पक्षितीर्थादि करुन ॥६॥

तेथो- नि चिदंबरीं आलें । सुंदरशास्त्रांचे घरीं राहिलें । शोधार्थ वाडीचे जन निघाले । श्री समाधिस्थ झाले ऐसें ॥७॥

वृत- कू-ट ऐकूनि भले । इतस्ततः शोधूं लागले । मायावरंच्या बाजारीं पातले । जाणिलें श्रीनीं लगेच ॥८॥

ते च- ट-कन शास्त्र्यां सांगून। मायावरंचे बाजारीं जाण। अंतोबादि वाडीस्थां येऊन। भेटतां तत्क्षण साश्चर्य ते ॥९॥

वाडी- स्थो-दंते[1] हंसती । आश्वासून त्यां परतविती। रामेश्वरादि फिरून येती । संध्यामंडपीं चतुर्मासा ॥१०॥

दम- क्ष-तें विधवा ब्राह्मणी। तंजावरस्थ येतां दर्शनीं। देतां तीर्थ वांति होऊनि। झाली तत्क्षणीं ती बरी ॥११॥

नंत- र रङ्गनाथदि तीर्थी । फिरतां कावेरीतटीं येती । इरोळमुक्कामीं भेटती। शृंगेरीस्थ आचार्यां ॥१२॥

तुष्ट उ-भय अन्योन्य दर्शनीं। आत्मैक्यभावें स्तोत्रसुमनीं । पूजितां धर्मप्रवर्तनीं । प्रार्थिती श्रींनां आचार्य ॥१३॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां शृंगेरीपीठाचार्यमिलनं नाम सप्तत्रिंशोऽध्यायः समाप्तः ॥३७॥ ओंव्या ॥१३॥



टीपः- १. वाडीकरांच्या वृत्तांतानें.

वा.स. ॥३९॥

# अध्याय ३८

अवा- च्य मोठ्यांची लीला। आत्मा एक देह निराळा । आले तेथोन श्री नेरोरा । सदाशिवेंद्र समाधीतें ॥१॥
स्वामी ते होऊन गेले । टिपुसुलतानाचे वेळे । ब्रह्मसूत्रवृत्यादि केले । ग्रंथ उत्तम जिहीं कैंक ॥२॥
मस्त ऊ-घडे फिरती सदा । म्लेंच्छसरदारें एकदा। स्त्रीचे सांगण्या वरुन हस्तां। छेदिलें दोन्हीं तयांचे ॥३॥
दुःखो- त्त-र तरी न काढिती । आनंदमग्न पुढें विचरती। पाहून तयांची विदेहस्थिती। पस्तावला मनीं म्लेंच्छ ॥४॥
तो न- मः करुन माफी मागे । पाहती स्वामी तथा मागें । छिन्न हस्त चिकटले अंगें। रडे गद्गद सरदार ॥५॥
झाला पु-ढें बद्धकर । बडवून घेई उदर गाल । बोधें यतींद्र तत्काळ । करितां स्थिर, भक्त झाला ॥६॥
सत्पु- रु -ष ऐसे सदाशिवेंद्र। जिवंत समाधि घेती सांद्र[1] । जाणून माहात्म्य योगीन्द्र । जाती दर्शना तेथें श्री ॥७॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां सदाशिवेंद्रस्वामिवर्णनं नाम अष्ट्‌त्रिंशोऽध्यायः समाप्तः ॥३८॥ ओंव्या ॥७॥

# अध्याय ३९

लोकै- ष-णा नसे ज्यांना । विचरती शैलकाननां। कालहस्त्यादि तीर्थे नाना । करुन चामरती ग्रामीं ॥१॥
सत्पुं- स्त्व- शाली[2] श्री आले। लोकीं गांवी स्थान न दिलें। वसंतक्षौरा न्हावी न मिळे। आले तथा कृष्णातटीं॥२॥
कृष्णे- न्यः-कः श्रद्धेत्[3] । ऐसें प्रार्थून तटीं निजत । रात्रीं क्रोधें कृष्णा वदत। ग्रामस्थां स्वप्नीं स्त्रीरूपें ॥३॥
कैसे प-तित तुम्हीं अरे । यतिवर्या स्थान द्या रे । क्षौरार्थ व्यवस्था करा त्वरें । सत्वर माफी मागून ॥४॥
कुम- र-णीं नाहीं तर । जाणा निश्चयें मराल । उठून कथितां परस्पर । घाबरुन सर्व ते ॥५॥



टीपः- १. मनोकुल २. सत्पुरुषाचे लक्षणांची विराजित. ३. हे कृष्णे ! दुसरा कोण (तुझ्यावर) विश्वास ठेवील.

गुरु- **मा**-उलीसी शोधून । नेती गांवांत प्रार्थून । क्षौरादि व्यवस्था करुन । ठेवून घेती आग्रहें ॥६॥
महा- **त्मे** न पाहिले ऐसे । म्हणून पूजिती लोक हौसें । कृष्णालहरी रचून तैसे । लोकां सत्पथें लाविती श्री ॥७॥
न अ-**त्यु**-ष्ण कृष्णातटीं। विचरत आले मुक्त्याला प्रति । चातुर्मास तेथें करिती । रचिती योगशिक्षादि ॥८॥
जाती **दा**-रुपात्रधर[1] । पीठापुरीं तेथून सत्वर । श्रीपादवल्लभजन्में जें अमर । तारी भक्तां दर्शनें ॥९॥
येती **ह**-षित तेथून । राजमहेंद्रीग्रामीं जाण । कोडरस्थ शास्त्री महान । नामें श्रीपाद आयर ॥१०॥
शुद्धां-**तः**-करणें दर्शना । येतां भगिनी सह त्यांना । म्हणती श्री पिशाचयातना । हिला कंपवात न ॥११॥
भूत **यो**-नि शास्त्री न मानिती। पीडी मनुष्यां कैसें म्हणती। सविधान यंत्रधूपें ती। होतां स्वस्थ, विश्वसिती ॥१२॥
झाली **लो**-कांत बहु ख्याति। शास्त्री पंडित दर्शना येती। द्राविडतैलंगणदेशीं मानिती। श्रींतें त्रीश[2] प्रत्यक्ष ॥१३॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां क्षौरलीलाकथनं नाम एकोनचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ॥३९॥ ओंव्या ॥१३॥

## अध्याय ४०

होती **क**-न्या दीक्षिताची। वाडीस्थ दत्तू पुजाऱ्याची। सीताबाई श्याम साची। चिंताग्रस्त पतित्यक्त ॥१॥
भजे **त्र**-स्त श्रींस सदा। पादधूली डबींत एकदा । संग्रहून पूजी सर्वदा। पतिदत्त[3] अल्प शेतीं ॥२॥
पिके **य**-त्किंचि् जो जोंधळा। त्यावरी पोट भरी बाला। एकदा पर्जन्य फार आला। असतां ज्वारी खळ्यांत ॥३॥
क्षण **मा**-त्रें ती धांवली। प्रार्थून श्रींतें डबींतील धूळी। खळ्या भोंवती टाकितां, वारि[4]। ज्वारींत थेंब पडे ना ॥४॥
भिज- **वि**-ली जमीन सारी । पर्जन्यें चहूंकडे बाहेरीं। ज्वारी मात्र कोरडी राहिली । पाहून आनंदली ती ॥५॥
आव- **श्य**-क समाग्री घेऊन। महापूजा वाडींत जाऊन। करवी सह ब्राह्मणभोजन। भावनेसम फळ देती श्री ॥६॥



टीपः- १. लांकडी कमंडलु धारण करणारे २. दत्त ३ पतीनें दिलेलें ४. पाणी

स्मृति **बि**-घडून वाणी स्तंभित । मारणप्रयोगें पित्याची होत । घेऊन सुत धोंडोपंत । कालकुंदरीकर त्यातें ।।७।।
येता **भ**-विष्य जाणून । म्हणती श्री अंतीं कल्याण। यांतचि ह्यांचे, त्या समान । लक्ष्मीनारायणमंदिरीं ।।८।।
हा म- **र्त्य** लोक सोडून। पूर्ण शुद्धींत हरिस्मरण । करतां गेला त्यांचा प्राण । उदाहरणें कैंक ऐशीं ।।९।।
श्रद्धा **व्य**-भिचार नसे । तरी अनुभव प्रत्यक्ष असे। चमत्कार होत असे। वाडींत श्री नसतांही ।।१०।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां श्रद्धाफलकथनं नाम चत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ।।४०।। ओंव्या ।।१०।।

## अध्याय ४१

लोक **य**-दा मागें लागती । तें तें स्थान सोडून जाती । अरण्यमार्गें विचरती। मंथनकालेश्वरीं येती तथा ।।१।।
वनीं **ई**-हा[1] सोडून तेथें । राहूं म्हणतां धमकवी वेतें । साहेबवेषें दत्त त्यांते । पवनीतें येती तदा ।।२।।
तों वि-**श्व**-सनीय जनीं। सांगतां कान्यकुब्ज द्विजमणि। भैरवप्रसाद आला चरणीं। मृतापत्यत्व[2] निवारण्या ।।३।।
सुपु- **रः**-सरणपूर्वक वृत्त । कथितां त्यानें श्री म्हणत । ब्रह्मराक्षस त्वद्वंशस्थ । करी घात शिशूंचा ।।४।।
मुक्ति **य**-दा मिळेल त्यातें । तदैव वृद्धि त्वद्वंशातें । विष्णुनामसहस्त्र पाठातें । करितां सबलि मुक्ति तया ।।५।।
पूर्व **स्मा**-रक ऐसें कथितां। खर्चून त्याने पुष्कळ वित्ता । ब्राह्मणद्वारें कर्म करवितां । केले यथार्थ न तिहीं ।।६।।
तो त- **क्ष**-ण गरुडेश्वरीं । पुनःदुःखित आला सत्वरीं । पापभीरु ब्राह्मणकरीं । करवितां कर्म श्रीआज्ञें ।।७।।
सत्व- **र** त्रासमुक्त झाला । वंश वाढून सुख पावला । ऐसा अनेकां अनुभव आला । लोकोद्धारक श्रीगुरुंचा ।।८।।
येतां **म**-नीं तेथून उठले । उनकदेवतीर्थं आले । शरभंग ऋषिनिमित्तें निर्मिलें । अग्न्यस्त्रें जें श्रीरामें ।।९।।



टीपः- १.इच्छा २. मुलें होऊन न जगणे.

उष्ण ती-र्थोदकीं तेथें । स्नान करितां भूक उघडते । शरीर हलकें फूल होतें । ऐसें दिव्य तीर्थ तें ॥१०॥

आले तो-यदश्याम[1] तेथून । माहूरगडीं वेगें जाण । अत्र्यनसूयारेणुके वंदून । दत्तदर्शन घेतलें ॥११॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां सकामानुष्ठानरहस्यं नाम एकचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ॥४१॥ ओंव्या ॥११।

## अध्याय ४२

दुर- ह- ङ्कारें शूद्रादि तदा । गांजिती वाडीस्थ विप्रां सर्वदां। गुंडूदीक्षितादि आपदा । निवेदिती येऊन श्रीपदीं ॥१॥

देती म-न्त्र सविधान । करुन श्री कृपेक्षण । करितां विप्रीं तदनुष्ठान । झाले तत्क्षण त्रासमुक्त ॥२॥

तेचि क्ष-र्णी श्री तेथून । रेणापुरीं जयंती करुन । गंगामसलें ग्रामीं जाण । गोदेकांठी पातले ॥३॥

लोकां रा-हवून मागें । जातां स्नानार्थ गांडासंगें । उतरले कित्येक पाठीमागें । आज्ञाभंगें आबाद्विज ॥४॥

गंगो- द-रीं तो बुडाला। कुळकर्णी रेणापुरस्थ भला। लोकीं सत्वर बाहेर काढला । प्राणास मुकला तरी तो ॥५॥

मृत पि-ण्ड तो पाहून । हाहाकार करिती जन । करितां श्रींनी दयार्द्रेक्षण । उठला क्षणें विप्र तो ॥६॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां आबाविप्रोज्जीवनं नाम द्विचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ॥४२॥ ओंव्या ॥६।



---

टीपः- १. मेघश्याम

वा.स. ॥४३-४४॥

# अध्याय ४३

जाती **चो**-रवत् तेथून । बारशीग्रामीं श्री तत्क्षण। अंबरीशराजधानी जाण । पुराणप्रसिद्ध जी असे ॥१॥

नृपो- **त्त**-म तारणार्थ । दुर्वासश्रापें भयग्रस्त । सोडून वैकुंठ हरि येत । विष्णुमंदिर तत्स्थळीं ॥२॥

श्री न-**मः** करून उभयांसी । दुर्वास आणि श्रीहरीसी । आले चंद्रभागातटासी । पंढरपुरीं सवेग ॥३॥

जेथें **अ**-से पांडुरंग । विटेवरी विठ्ठल श्रीरंग । पुंडलका कारणें अभंग । युगें अठ्ठावीस तिष्ठत ॥४॥

जया **तो**-षवी भक्तश्रेष्ठ । मातापितासेवनें विष्णूप्रत । कुक्कुटदर्शनें काशीस्थ । पूर्वदुष्टता टाकून ॥५॥

मंद **स्मि**-तें तो उभा ठेला । कटीं कर ठेवून सांवळा । पुंडलीकवरदा त्या विठ्ठला । नमस्कारून श्री तदा ॥६॥

येती **लो**-कोत्तर वाडींत । आनंदराव शिंदे तेथ । नोंदणीकामदार वटोदरस्थ । येत त्रस्त अतिसारें ॥७॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां पंढरीक्षेत्रगमनं नाम त्रिचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ॥४३॥ ओंव्या ॥७॥

# अध्याय ४४

होता **के**-वळ अस्थिपंजर । दिला देवें द्रष्टांत त्रिवार । गांडासंगें तदनुसार । न येतां त्रास वाढला ॥१॥

तें नि- **वे**-दून सर्व वृत्त । पायां पडून माफी मागत । श्रींनी गांडामुखें प्रायश्चित्त । सांगून निमित्त औषध ॥२॥

तया **दे**-ववितां तो पूर्ण । होऊन रोगमुक्त तूर्ण । गेला नोकरी वर जाण । गुरुकृपेनें सत्वर ॥३॥

झाली **च**-तुर्दिशीं कीर्ति । दूरदूरचे लोक येती । कोरेगांवस्थ श्रद्धाळु अति । शंकर बोके विप्र एक ॥४॥

त्यासी **प्र**-सिद्ध गोदावरी । होती कन्या एकच बरी । लग्नानंतर तिला अंतरी । वाटूं लागलें कीं पुरुष मी ।।५।।

ती व्य- **थि**-तस्वान्त[1] मिरजेस । जाऊन सांगतां दाक्तरास । शस्त्रक्रियेने पाहतां तीस। पुरुषत्व आढळलें ।।६।।

हृष्टां- **त**:-करणें दाक्तरें । कळविलें तत्पित्यास त्वरें । कृतज्ञतेनें सर्व गेले। श्रीदर्शना वाडीस ।।७।।

नांव **पु**-मर्थक गोविंद । ठेवून करिती व्रतबंध । लग्नाचाही झाला प्रबंध । त्वरित त्याचे सुस्थळीं ।।८।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
शिंदेरोगहरणादि नाम चतुश्चत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ।।४४।। ओंव्या ।।८।।

## अध्याय ४५

श्रीगु- **रु** भक्तार्थ ऐसी लीला । करितां वाडींत ते वेळां । जमे असंख्यात भक्तमेळा । भोजनसोहळा वर्णवेना ।।१।।

होती **षो**-डश पक्कान्नें । नित्य ब्राह्मणसंतर्पणें । महारुद्रादि अनुष्ठानें । रोगशान्त्यर्थ करिती जन ।।२।।

द्विजो- **त्त** -म मध्वपंथी । वैष्णव एक धर्मांध द्वैती । येऊन न पाळितां श्राद्धादिनीति । डसिलें तया वृश्चिकें ।।३।।

दुस्त - **म:** शांतवी भास्कर । तेवी 'नमः शिवाय' मंत्रोच्चार । करवूनि श्री त्यासी सत्वर । करिती स्वस्थ कौतुकें ।।४।।

पुण्ये **यो**-ग त्याचा आला। पंथाभिमान त्याचा निमाला । जयजयकारें वंदूनि गेला। श्रीपदा श्राद्धादि करुनि ।।५।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
शिवविष्णवोरभेदकथनं नाम पंचचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ।।४५।। ओंव्या ।।५।।



टीपः- १. दुःखितांतःकरण.

वा.स. ॥४६-४७॥

## अध्याय ४६

स्वेच्छा-**मा**-त्रें फिरत फिरत । तेथून श्री हावनूरीं येत । शाळाध्यापकाचें गलत्कुष्ठ । अनुष्ठानें दूर करिती ॥१॥
भक्त **मे**-ळा जमतां एकदा। आली डोळींत मध्वस्त्री तदा। दुःखें त्रस्त वंदितां श्रीपदा। मंत्रे वारि प्रोक्षिती श्री ॥२॥
भूत **व**-दे देहस्थ तिचे । जातो सोडून शरीर हिचें । झालों धन्य दर्शनें श्रींचे । द्यावी चरणसेवा पुढें ॥३॥
ऐसें **म**-हादैन्यें बोलून । जातां पिशाच तिला सोडून । गेली बाई घरीं चालून । आश्चर्यमग्न सर्व होती ॥४॥
होतां **सं**-पूर्ण चातुर्मास। शृंगेरी आदि फिरुन खास। स्तोत्रें आचार्यां प्रार्थून वास। करिती गालवक्षेत्रीं पुढें ॥५॥
वेद- **मू**-र्तिब्राह्मणजन । रुद्रादि स्वाहाकार जाण। करुन तेथे श्रेयः संपन्न। झाले श्रीआज्ञेनें तदा ॥६॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां गलत्कुष्ठादिहरणं नाम षट्चत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ॥४६॥ ओंव्या ॥६॥

## अध्याय ४७

तें च- **ढो** -न कृष्णेचा घाट । जैनापुरीं आले भक्ततात। लिंगायतस्त्रीतें मूर्च्छामुक्त । करिती सेवा सांगून ॥१॥
[1]गाधि-**जा**-चें तपःस्थानीं । छायाभगवतीवनीं । गायत्रीपादुका वंदूनि । आले तेथून काडलूरा ॥२॥
स्नानें **ना**-से पापौघ जेथ । कृष्णाभीमासंगमीं येथ । होतां गुरुवर तृषार्त । न मिळे ताक वैष्णवालयीं ॥३॥
दुर्म- **ति**-त्वें तेणें हाणिली । येतां कामधेनु स्वयं घरीं । क्षमामूर्ति गुरुमाउली । येत कुरवपुरीं पुढें ॥४॥
तेथें **पु**-ढाकार घेऊन । तुळजाराम कोमटी जाण। करी सेवा चतुर्मासान्त पूर्ण । रायचूरस्थ पतंगे ॥५॥



टीपः- १. विश्वामित्र

तेणें **रु**-जा[1] पत्नीस्नुषेची। गेली चिर भूतबाधेची। करितां पूजा गोणट्याची। श्रींचे निजण्याच्या गांडाझें ॥६॥
सत्तो- **षो**-क्ति[2] न कधीं निष्फळ । तेथून तुळजापुरीं गुरुवर । वंदून देवीपद विमळ। आले सत्वर गोदातटीं ॥७॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां
सत्सेवाफलकथनं नाम सप्तचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ॥४७॥ ओंव्या ॥७॥

# अध्याय ४८

भक्तो- **त्त**-म बापूगोसाव्या। बोधें मध्येंच परतवून तया। परळी वैजनाथादि लीलया । फिरुनियां आले राजूरीं ॥१॥
तेथें **मं**-त्रसंहितेचा । स्वाहाकार केला साचा । बंधू सीतारामें दर्शनाचा । दिला श्रींच्या लाभ सर्वा ॥२॥
श्री अ- **स**-तां तेथें प्रार्थिती । दामोदरस्वामी भाविक अति । जातां वझूरीं दर्शन देती। अन्यरुपें त्यांते श्री ॥३॥
लोक **स**-र्ववाट पाहती। इकडे श्री औढ्या नागनाथीं । घेऊन दर्शन जातां पथीं। पाथरीग्रामीं शेत रमणा ॥४॥
तें पू- **र्व** पुण्यें चौधरींचे । उल्लंघितां देखती साचें । जाणूनि कारण शून्यत्वाचें । वदती वाचें श्री तदा ॥५॥
येथें **वि**-जनीं[3] ज्याची कबर । त्या पीराचे तोषार्थ फकीर । पांच पंचवीस निर्धार । जेवूं घालिता [4]प्रत्यद्वीं ॥६॥
न उ- **द्व**-वेल कधीं त्रास । करितां तैसें सविश्वास । येऊं लागलें उत्पन्न खास । शेंकडों रुपयांचे बाळेरावां ॥७॥
येतां **ज**-वें गौंडग्रामा । तेथून रेणुकासद्धामा । अंबादास यथार्थनामा । कायरग्रामींचा करी यज्ञ ॥८॥
होतां **ति**-कडे पूर्णाहुती । मेली शामराव-दौहित्री[5] ती । दक्षिणाद्रव्य चौधरीहातीं । येती कोणी न पुढें ॥९॥
उत्त- **मां**-गें[6] करिती खूण। न जाण्या तिकडे श्रींसी जाण। प्रोक्षितां श्रींनी कमंडलुजीवन। आले प्राण प्रेतासी ॥१०॥



---
टीपः- १. रोग, दुःख २. सत्पुरुषानें संतोषानें काढलेलें वचन ३.अरण्यांत ४. दरवर्षी ५. मुलीची मुलगी ६. डोक्यानें.

विप्रां- स दक्षिणा पोंचली। जयजयकारें समाराधना झाली। तुष्ट शामरावें वंदिलीं । पाउलें श्रींचीं सद्भावें।।११।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां कन्यापुनरुज्जीवनं नाम अष्टचत्वारिंशोऽध्यायः समाप्तः ।।४८।। ओंव्या ।।११।।

# अध्याय ४९

अग- र्व प्रार्थिती श्रींतें। अरण शिकविण्या उपाध्यांतें। गोपेगांवच्या निंबातळीं त्यांतें । अरणसंथा देती श्री ।।१।।

त्या प्र-भा-वें तो निंब कडू । झाला किंचित्काळें गोडू । भक्षितां पानें रोगमूळू । खंडूं लागला सत्संगे ।।२।।

पुढें वे-गे मंजरथग्रामीं । येती गोदेच्या हृदयधामीं। सर्पदष्ट स्त्रीतें अकामी। करिती स्वस्थ मंत्रबळें ।।३।।

तेथू- न पांचालेश्वरा । येती दत्ताचे भुक्तिस्थळा । जाती पुढें पैठणनगरा । झाले जेथें एकनाथ ।।४।।

नाथें भा-वें मूर्तिस्थापन । केलेलें स्थान फिरवून । स्थानांतरीं बसवितां जाण । देव तत्स्थानीं बैसे ना ।।५।।

[1]वत्स- र बारा विघ्नें नडती । पुसतां नाथवंशजें श्रीं प्रति । पूर्वस्थानीं स्थापावया ती। सांगती श्री सूक्ष्मबोधें।।६।।

त्यांनीं त-सें करितां प्रतिष्ठा । झाली निर्विध्न तेथें तथा । देव नाथांचा ऋणी सर्वथा । भक्त्यंकित राबे घरीं ।।७।।

शिपा -इ होऊन राखी द्वारा । वाही पाणी बारा वत्सर । अजूनि उत्सवीं निर्धार । येत प्रचीत भाविकां ।।८।।

प्रण- ति करुन वेगें तेथ। आले श्री देवगिरी प्रत। जेथें जनार्दन स्वामींसी दत्त । पूर्वी सोंगट्या खेळती ।।९।।

टीपः- १. वर्षे.

धन्य गु-रु धन्य चेला । जिहीं माधव वश केला । उभय वंदूनि वेरुळा । घृष्णेश्वरदर्शना आले श्री ॥१०॥

तैं स-ह्य घाट उतरुन । येतां चाळीसगांवी जाण। प्रेमें गांडाबुवास बोधून । साधनार्थ परतविती ॥११॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां नाथवंशजानुग्रहो नाम एकोनपंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः ॥४९॥ ओंव्या ॥११॥

## अध्याय ५०

प्रेमें त-यासी श्री सांगती । स्वार्थास जन पाठीं लागती । सोडून त्यांस एकांती । जाऊन स्थित स्वरूपीं हो ॥१॥

आले मं-जुस्वन[1] तेथून । चिखलद्यास वेगें जाण । होतां चातुर्मासपूर्ण । शूलपाणीच्या झाडींत ॥२॥

येती शा-न्त्यर्थ कातरखेडीं। तेथेंही लोकांच्या पडापडी। जिंतुरकरां परतवून दडी। गरुडेश्वरीं मारिती तदा ॥३॥

शस्त्र- स्त्र-सज्ज गजासुर । गरुडहस्तें मरतां निर्धार । पावला येथें मुक्ति विमळ । लाघला स्थान शिवगणीं ॥४॥

अस्थी मि-ळतां नर्मदाजळीं। दिव्य देह लाधला सुरारि[2] । कोरोटेश्वर लिंग त्या स्थळीं। स्थापिलें तेणे शिवाज्ञें ॥५॥

नार- द ज्ञान संपादन । करी सनत्कुमारापासीं जाण । नारदेश्वर तेचि स्थान । जेथें स्नानादि करिती श्री ॥६॥

गजा मु-क्त गरुडें केलें । गरुडेश्वर लिंग स्थापिलें । तन्नामें स्थान प्रसिद्ध झालें। राहतां श्री तेथें तथा ॥७॥

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां गरुडेश्वरागमनं नाम पंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः ॥५०॥ ओंव्या ॥७॥



टीपः- १. मधुरस्वर २. राक्षस

# अध्याय ५१

वा.स. ।।५१।।

तैं न-क्तं-दिन[1] जिंद पीडित । आला पारशी एक क्रंदत । होऊन स्वस्थ अल्प दिनांत । गात गुरुगुण गेला तो ।।१।।
पुत्र म-ध्याह्नीं बेपत्ता । बडोद्याचे बाईचा होतां । कबुलून दोष नाक घांसितां । आणून दिधला श्रीकृपें ।।२।।
येती या-त्र्यौघ नित्य दर्शना । चमत्कार होती नाना। पूजन भजन समाराधना । वर्णन कोण करी त्याचें ।।३।।
पाहू- न तोषें लीला समाप्ति। करण्या विचारिती श्रीस्वान्तीं । स्वस्वरुपीं लीन होती अंतीं। देह नश्वर सोडून ।।४।।
भक्तां घ-डे अद्यापि दर्शन । पुण्यतिथी उत्सवीं जाण। असंख्यात लोटती जन । आषाढ शुद्ध प्रतिपदेसी ।।५।।
यात्रा ए-ऱ्हवींही जमत। समाधिस्थानीं दर्शनार्थ । भावें स्फटिक लिंग पूजीत । नर्मदेंत न्हाउनी ।।६।।
जातां त-सेच दत्तमंदिरांती। [2]दत्त-आचार्य-सरस्वती-मूर्ति । दर्शनमात्रें पापें हरती। असती घाट धर्मशाळादि ।।७।।
अस- द्बु-द्धि नासे तेथ । वसे वासुदेव-दत्त जेथ । भक्तां प्रत्यक्ष प्रचीत येत। भूवैकुंठ गरुडेश्वर।।८।।
न हृ- द्धा-न्त[3] अल्प राही । आनंद मंगल सदाही । आधी व्याधि उपाधि नाहीं। दैन्य कदाही न भक्तां ।।९।।
भवीं बु-डतां ग्रही हात । वासुदेव प्रत्यक्ष दत्त । येई धांवून संकटांत । जाणती अनुभवी ।।१०।।
समृ- द्धि नांदे नित्य तेथें । करिती सिद्धी दासत्वातें । ग्रंथ **सप्तशती** हा जेथें। वाचितां न पुनर्भव[4] ।।११।।
कृपा-मा-त्रें मुक्या बोलवी । पंगूतें डोंगर चढवी। हृदयस्थ तोचि ग्रंथ लिहवी । वासुदेव स्वयं दत्त ।।१२।।
धीमा-न्स्या-द्वादिकत्व[5] सोडून । श्रद्धेनें वाचितां नित्य जाणा । इह परत्र कल्याण। पुन:पुन:. काय सांगों ।।१३।।
हा य-त्कृ- पेनें पूर्ण झाला । तत्पदींच अर्पूण याला । होऊन 'रंग' मोकळा । मिळाला तूर्ण तद्रूपी ।।१४।।

इति श्रीदत्तपादारविंदमिलिंदब्रह्मचारिपांडुरंग (रंग अवधूत) महाराजविरचितायां श्रीवासुदेवसप्तशत्यां लीलासंवरणं नाम एकपंचाशत्तमोऽध्यायः समाप्तः ।।५१।। ओंव्या ।।१४।। एकूण सं. ।।७००।।



टीपः- १. रात्रदिवस २. शंकराचार्य ३. हृदयांधकार ४. पुनर्जन्म ५. शंकाशीलपणा.

# 卐 आरती 卐

जय **त**-मालदलश्यामला । अनसूयात्रिकुमारा । भक्तजनांच्या माहेरा । ओवाळूं तुज आरती ॥१॥

देईं **कृ**-पेचें अमोघ दान । पोळलों त्रितापें दारुण । ज्ञानामृतमेघ वोळवून । शांतवीं चित्त हें माझें ॥२॥

अग- **त्य** धरुन अंतरीं । नित्य वसावें या श्रीहरी । वृत्ति साकारनिराकारीं । चंचल न व्हावी ही माझी ॥३॥

पुर- **श्च**-रण त्वन्नामाचें । निरंतर घडावें वाचें । श्रवणीं श्रवण त्वद्गुणांचें । नेत्रीं रुपाचे दर्शन ॥४॥


पायीं **भा**-वें त्वद्धामगमन । हातीं संतचरणसेवन । अंतःकरणीं त्वत्स्मरण । हेचि दान मागूं सदा ॥५॥

धर्म **र**-हस्य कर्ममर्म । कळून व्हावें म्यां निर्मम । निरहंकार निष्काम । वर्तावें निःसंग आत्मौपम्यें ॥६॥

सर्व **<u>त</u>**-या काय अर्पूं । नाहीं माझें काय समर्पूं । नको बापा वृथा कोपूं । ओपूं पायीं, घडे जें ॥७॥

इति श्रीवासुदेवसप्तशतीग्रंथ : समाप्तः ॥ ओंव्या स. ७०७ ॥

(आषाढ शुद्ध १ शके १८६८)

 ॥ शुभं भवतु ॥ 

## ॐ स्तोत्र ॐ

रसज्ञावशात् तारकं स्वादुलभ्यं गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ।
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त[1] ॥१॥
वियोन्यंतरे दैवदार्ढ्याद्विभो प्राग् गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ।
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥२॥
मयामातृगर्भस्थितिप्राप्तकष्टाद्, गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ।
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥३॥
मया जातमात्रेण संमोहितेन, गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ।
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥४॥
मया क्रीडनासक्तचित्तेन बाल्ये, गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ।
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥५॥
मया यौवनेऽज्ञानतो भोगतोषाद् गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ।
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥६॥
मया स्थाविरे[2] [3]निध्नसर्वेन्द्रियेण गृहीतं कदाचिन्न ते नाम दत्त ।
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥७॥
हृषीकेश मे वाङ्मनःकायजातं हरे ज्ञानतोऽज्ञानतो विश्वसाक्षिन् ।
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥८॥
स्मृतो ध्यात आवाहितोस्यऽर्चितो वा न गीतः स्तुतो वंदितो वा न जप्त :
क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं क्षमस्वापराधं प्रभो क्लिन्नचित्त ॥९॥
दयाब्धिर्भवादड् न सागाश्च[4] मादग् भवत्याप्तमन्तोर्भवान् मे शरण्यः।
यथाऽऽलम्बनं भूर्हि भूनिःसृतांघ्रेरिति प्रार्थितं दत्तशिष्येण सारम् ॥१०॥



टीपः- १. (दयेमुळे ) ज्याचें मन द्रवलेलें आहे असा . २. म्हातारपणीं ३. परवश ४. अपराधी.

# ॐ अघोरकष्टोद्धरणं स्तोत्रम् ॐ

श्रीपाद श्रीवल्लभ त्वं सदैव । श्रीदत्तास्मान्पाहि देवाधिदेव ।।
भावग्राह्य क्लेशहारिन्सुकीर्ते। घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।१।।

त्वं नो माता त्वं पिताऽऽप्तोऽधिपस्त्वम् ।। त्राता योगक्षेमकृत्सद्गुरुस्त्वम् ।।
त्वं सर्वस्वं नोऽप्रभो विश्वमूर्ते।। घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।२।।

पापं तापं व्याधिमाधिं च दैन्यं । भीतिं क्लेशं त्वं हराऽशुत्वदन्यम् ।।
त्रातारं नो वीक्ष ईशास्तजूर्ते। घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।३।।

नान्यस्त्राता नापि दाता न भर्ता । त्वत्तो देव त्वं शरण्योऽकहर्ता ।।
कुर्वात्रेयानुग्रहं पूर्णराते । घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।४।।

धर्मेप्रीतिं सन्मतिं देवभक्तिम् । सत्संगाप्तिं देहि भुक्तिं च मुक्तिम् ।।
भावासक्तिं चाखिलानंदमूर्ते। घोरात्कष्टादुद्धरास्मान्नमस्ते ।।५।।

श्लोकपंचकमेतद्यो लोकमंगलवर्धनम् । प्रपठेन्नियतो भक्त्या स श्रीदत्तप्रियो भवेत् ।।६।।


।। इति श्री प.प. श्री वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराज विरचित
अघोरकष्टोद्धरणं स्तोत्रम् संपूर्णम् ।।

## ॥ श्रीदत्तः प्रसन्नोऽस्तु ॥



मौने मौनी गुणिनि गुणवान् पण्डिते पण्डितो वा
दीने दीनः सुखिनि सुखवान् भोगिनि प्राप्तभोगः ।
मूर्खे मूर्खो युवतिषु युवा वाग्मिनि प्रौढवाग्मी
धन्यः कोऽपि त्रिभुवनजयी योऽवधूतेऽवधूतः॥

श्रीशंकराचार्याः ।



**प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती (टेम्बे) स्वामी महाराज**

**जन्म स्थान - माणगांव**



प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती (टेम्बे) स्वामी महाराज
समाधी स्थान, श्रीक्षेत्र गरुडेश्वर